सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ८ वे : अंक ११

फेब्रुवारी २०२३

स्वागतमूल्य ₹. 30/-



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# ‘कोल्हापूर चित्पावन संघ’, ‘ब्राह्मण सभा करवीर’ आणि ‘ॲपल कॅन्सर इन्स्टिट्यूट’ यांच्या संयुक्त विद्यमाने

# आरोग्य शिबिराचे आयोजन

कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर आणि ॲपल कॅन्सर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिनानिमित्त आयोजित महिलांसाठी मोफत कर्करोग शिबिरास महिलांनी मोठा प्रतिसाद दर्शवला. उद्घाटन ब्राह्मण सभा करवीरचे खजानिस रामचंद्र टोपकर, सहकार्यवाह अनुराधा गोसावी, वृषाली कुलकर्णी, चित्पावन संघाचे अध्यक्ष नंदकुमार मराठे, संगीता आपटे, सीमा गोखले, ॲपल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी संचालिका गीता आवटे, डॉ. यशस्वी चौधरी, डॉ. नाकिया मुल्ला यांच्या हस्ते झाले.

रुग्णांची कॅन्सर तपासणी, ब्लड शुगर, इसीजी तपासणी करण्यात येऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचे संयोजन श्रीकांत लिमये, प्रसाद भिडे, केदार जोशी, संतोष साने, मकरंद करंदीकर, महेश पटवर्धन यांनी केले.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ८ वे : अंक १२ : मार्च २०२३**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


**अनुक्रम**


१) **संपादकीय** /४

२) **आम्ही कृष्णसख्या – 'राधा'** /५
- ज्योत्स्ना शिंत्रे

३) **गुढी पाडवा – एक सांस्कृतिक उत्सव** /८
- नंदकुमार मराठे

४) **म्हणींचे म्हणणे** /१० - वैदेही जोशी

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १२
- सौ. मंजुश्री गोखले

६) **ज्ञानसूर्याची सावली** /१४
- सौ. मंजुश्री गोखले

७) **मुलांचे करिअर आणि पालकांची मानसिकता** /१७ - वैभव फाटक

८) **लोणार सरोवराच्या बाजूचे विस्मयकारी रामाचे मंदिर** / २१ - संकलित

९) **झपुर्झा** /१२ - अविनाश जोग

१०)

११) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडीलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६**
**(साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २३ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी,

नमस्कार मंडळी कसे आहात? उन्हाळा सोसताय ना? पण एकंदरीत सांगू का भारतातील किंबहुना सगळ्या जगातलं हवामान विक्षिप्त झालंय. अहो काय? कुठं थंडी, कुठं पाऊस, कुठं बर्फ वृष्टी, कुठं भूकंप तर कुठं उन्हाळा ! भारतात भाषेची, संस्कृतीची, रितीरिवाजांची, पोशाखांची विविधता आहे हे माहित होतं पण हवामानात इतकी प्रचंड तफावत? कमाल आहे ! राजकीय पुढाऱ्यांच्या वरताण झाली की ! असो, अर्थात ही अशी विविधता (चांगल्या अर्थाने) आपल्या नवस्नेहमध्ये ही आहे हो ! आवडताहेत ना तुम्हाला लेख? अभिप्राय नक्की कळवा हं ! आणि कुठले विषय वाचायला आवडतील ते ही सुचवा. आम्ही त्या विषयांचा समावेश नक्की करु.

मंडळी या महिन्यात गुढीपाडवा. म्हणजे हिंदू नववर्ष ! मला असं वाटतं ना की एक जानेवारी पेक्षा अधिक जोमाने हे साजरं केलं जावं. नुसते संदेश आणि ईमोजी न पाठवता काही तरी असा कार्यक्रम घ्यावा ज्या मुळे सर्व हिंदू एकत्र येतील, आणि ३१ डिसेंबर पेक्षा अधिक जोमाने नववर्षाचं स्वागत करतील.होईल होईल ते ही होईल आता ! आशा करायला हरकत काय ?

अखिर उम्मीद पे ही तो दुनिया कायम हैं !

आता परिक्षांचे दिवस आहेत. विद्यार्थ्यांची आणि आई वडिलांची दोघांची परीक्षा. तेंव्हा या दोन्हीही परीक्षार्थींना बेस्ट लक ! नवस्नेहच्या परीवारातर्फे हार्दिक शुभेच्छा !

उन्हाळा सुरू झाला आहे पण आता आंबा ही येईल. मग उन्हाळा जाणवणार नाही. तेंव्हा चिंता नको. खरं ना? बाकी सगळं अंक वाचल्यावर सांगा.

**कुछ बातोंसे मतलब हैं**
**कुछ मतलब की बातें,**
**जबसे फर्क समझा**
**जिंदगी आसान हो गयी है ।**

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

## प्रकाशन सोहळा




**'माझ्या अनुभवांची शस्त्रक्रिया'** या 'नवस्नेह' मध्ये वर्षभर येत असलेल्या डॉ. पी. जी. कुलकर्णी यांच्या लेखमालेचे पुस्तक श्रीअत्री प्रकाशन यांनी प्रकाशित केले असून रविवार, दि. २६ फेब्रुवारी २०२३ रोजी सायं. ५ वा या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे अध्यक्षतेखाली डॉ. रणवीर शिंदे यांचे होत आहे. कार्यक्रमास आमच्या शुभेच्छा !

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# आम्ही कृष्णसख्या - राधा

**(लेखांक दुसरा)**

राधा ही कृष्णाच्या आयुष्यात आलेली पहिली परकी स्त्री. त्या अगोदर त्याच्या आयुष्यात फक्त त्याची जन्मदायी आई देवकी आणि त्याची दत्तक आई यशोदा याच स्त्रिया होत्या.

कृष्णाला जन्म झाल्या झाल्या त्याचे प्राण वाचावेत म्हणून त्याच्या पित्याने, वसुदेवाने त्याला मथुरेतून गोकुळात आणून सोडले. माता यशोदेच्या कुशीत, एखाद्या शिष्याला गुरुच्या ओटीत घालावे तसे. कृष्ण गोकुळात वाढला, मोठा झाला आणि मग त्याने कोवळ्या वयात कंसासारख्या दुष्टाची हत्या करून समाजाला भयमुक्त केले. त्याने पुढे भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे 'विनाशाय दुष्कृताम्' ची सुरुवात केली. गोकुळात असताना सुद्धा त्याच्यावर अनेक संकटे आली, त्यांचा त्याने सहजच नाश केला.

अशा या कृष्णाला पहिल्यांदाच पाहून गोकुळातले लोक त्याच्या प्रेमात पडले. अतिशय 'सावळे सुंदर रूप मनोहर' असा कृष्ण सर्वांनाच प्रथमदर्शनीच प्रिय झाला. गोकुळातले सर्व लोक – पुरुष आणि स्त्रिया – त्याच्या प्रेमातच पडले.

या सर्वांमध्ये सर्वात जास्त स्वत:ला हरवून बसली ती म्हणजे 'राधा' : अनय पत्नी राधा. ती जेव्हा कृष्णाच्या सहवासात आली, तेव्हा ती विवाहित होती. गोकुळातील एक गवळण. गायी गुरे सांभाळायची. गायीचे दूध दोहन करायचे, ते दूध, त्याचे दही, लोणी मधुरेच्या बाजारात नेऊन विकायचे, असे तिचे आयुष्य हरीदर्शनाने बदलून गेले. कृष्णाच्या प्रथम दर्शनाने तिला जणू हरी प्राप्तीचा चटका लागला. मग तिची अवस्था म्हणजे – 'राधा गौळण करिते मंथन, अविरत हरिचे मनात चिंतन' अशी झाली. सतत हरी रूपाचे चिंतन करत राहिल्यामुळे तिला फारच लवकर हरी प्राप्ती झाली आणि ती कृष्णाची अंतरंग सखी होऊन गेली. बहुतेक सर्वच गोप–गोपिकांची कमी अधिक प्रमाणात कृष्णदर्शनाने हीच अवस्था झाली होती. पण राधेच्या बाबतीत मात्र – 'पूर्वीचा तो दोरा उगवेल' अशी तुकाराम महाराजांनी सांगितलेली अवस्था निर्माण झाली होती.

राधेचे जे वर्णन इतर भक्ती मार्गात – उदा. पुष्ठीमार्गात सापडते, ते तिचे बाह्य रूप सुद्धा कृष्णाला पूर्णपणे अनुरूप आहे. राधा गोरीपान होती, पण तिच्या वस्त्रांचा रंग मात्र निळसर काळसर असा वर्णन केलेला आहे. जणू तिने कृष्ण प्रेमाची वस्त्रेच परिधान केलेली होती. तिला फुलांचा शृंगार करणे पसंत होते. शिवाय दिवस रात्र कृष्णाच्या मुरलीची धून तिला ऐकू येत असे. जणू काही अनाहत नादाची, त्याकडे ओढली जाऊन जननिंदेची परवा न करता, ती श्रीकृष्ण सहवासात दिवस रात्र रहात असे.

राधा या शब्दाचा अर्थ दोन प्रकारे लावता येतो. असे ब्रह्मवैवर्त पुराणात सांगितले आहे.

'राधा भजति तम कृष्णम स तां च परस्परं
उभयो: सर्वसाम्यम् च सदा सन्तो वदन्ति च'

राधोपनिषद सांगते की, 'राधाकृष्णोयोरेकमासनम' आणि 'एकम पदम'. म्हणजेच राधाकृष्ण हे एकच आहेत. ते कधीच वेगळे होऊ शकत नाहीत. ते दोघेही इतके एकरूप झाले होते, की आधी 'आराधिका' असलेली राधा पुढे कृष्णाची 'आराध्या' झाली. म्हणजे कृष्णच तिची भक्ती करू लागला.

राधेचे नाव 'राधा' या संस्कृत धातू (क्रियापद) पासून तयार झालेले आहे. आता आपण तिच्या भौतिक माहितीकडे वळूया.

राधेचा जन्म वृषभानू नावाच्या एका गोपाच्या आणि त्याची पत्नी कीर्ति यांच्या पोटी यमुनेच्या तीरावरील रावल गावी झाला होता. ती कृष्णापेक्षा वयाने मोठी होती. जेव्हा कृष्णाचा बालरूपात प्रवेश झाला, तेव्हा ती चार–पाच वर्षांची असावी. कारण ती कृष्णाला खेळवीत असल्याचे उल्लेख सापडतात. वृषभानू काही काळानंतर बरसाना इथे राहण्यास गेला होता. तिचा जन्मही कृष्णासारखाच अष्टमीलाच झाला होता. पुढे तिचे लग्न माता यशोदा हिच्या

भावाशी – म्हणजे अनयाशी झाले. तेव्हा नात्यानी ती कृष्णाची मामी होती. पण ती कृष्णापेक्षा वयाने फार मोठी नव्हती. गर्ग संहितेत लिहिल्याप्रमाणे एकदा नंदबाबा कृष्णाला घेऊन बाजारात गेलेले असताना वृषभानू आणि राधेची त्यांच्याशी भेट झाली. हे ठिकाण 'सांकेतिक तीर्थ' या नावेने प्रसिद्ध आहे आणि नंदगाव आणि बरसाना यांच्यामध्ये रस्त्यावर मध्ये आहे. ही जागा म्हणजे जणू काही श्रीकृष्णदर्शनाचा संकेतच होता. म्हणूनच त्याचे नाव 'सांकेतिक तीर्थ' असे असावे. कृष्णाला भेटल्यावर राधा हरवून गेली. 'माझी न मी राहिले, तुजला नाथा सर्व मी वाहिले' अशीच तिची अवस्था झाली. ती कृष्णमय होऊन गेली.

त्यानंतर कंसाच्या अत्याचारातून वाचण्यासाठी नंद आपल्या कुटुंबाला आणि आपल्या गावकऱ्याना घेऊन नंदगाव सोडून वृंदावन येथे येऊन राहिला. तिथेच बरेचसे बरसाना या गावातील लोक याच कारणासाठी येऊन राहिले होते. त्यात राधेचे कुटुंबही होते. इथेच वृंदावनातच राधा-कृष्णाचे पुनर्मिलन झाले आणि राधेचा भक्तिभाव वाढीला लागला. तिला कृष्णरूपाचा दिव्य साक्षात्कार झाला आणि ती कुटुंबाची, समाजाची, लोकांच्या टीकेची कसलीही पर्वा न करता कृष्णभक्तीत विलीन होऊन गेली. ती कृष्णच होऊन गेली. कृष्ण वृंदावनात रासक्रिडा करत असे, बासरी वाजवत असे. त्याचा अर्थ एक असा घेता येईल, की कृष्णभक्तीत रंगून गेलेल्या गोप-गोपिका त्याच्या तालावर वावरत असत. त्याच्या इच्छेने चालत बोलत असत.

'देवाच्या इच्छेने वर्तावे' असे संतांनी सांगूनच ठेवलेले आहे. त्याला अनुसरून या गोप-गोपिका वागत असत. त्यात राधा ही तर कृष्णमयच होऊन गेली होती. त्यामुळे समाज नियमांची पर्वा करण्यापलीकडे ती गेली होती. तिच्या या वागण्यामुळे तिचा अनय तिच्यावर नाराज रहात असे. तिच्या वागण्याला प्रतिबंध करीत असे. कधी तिला मारतही असे. घरात कोंडूनही ठेवत असे. पण तिच्या मनात अखंड चालणाऱ्या हरि-चिंतनाला तो कसा पायबंद घालू शकणार होता? अखंड भक्तीत रंगलेल्या राधेला मानसिक पातळीवर, भक्तीच्या पातळीवर कुणीच अटकाव करू शकत नव्हते. त्यामुळे कृष्णाबरोबरीची तिची रासक्रीडा, तिचं कृष्णावरचं भक्तिप्रेम, तिची कृष्णाप्रती असलेली निष्ठा कधीच कमी होऊ शकली नाही.

त्यामुळेच कृष्ण जेव्हा वृंदावन सोडून मथुरेला जायला निघाला, तेव्हा राधेने ते मनोमन मानून घेतलं. आता कृष्णाचे शरीरदर्शन तिला होणार नव्हतं. पण तिच्या अंतर्चक्षूंना दिसणारा, स्पर्शणारा कृष्ण तिच्यापासून कोण हिरावून घेऊ शकणार होता? तिच्या आंतर्कणांना ऐकू येणारी त्याची मुरली तिला ऐकू येतच राहणार होती. त्या मुरलीवर फक्त तिचा आणि इतर गोप-गोपिकांचाच हक्क होता. म्हणूनच कृष्ण मथुरेला जाताना मुरली वृंदावनातच सोडून गेला असा एक उल्लेख सापडतो. त्यानंतर त्याने पुन्हा कधीच मुरली वाजवली नाही. आता त्याचे कार्य हे मानवी पातळीवर सुरू झाले होते 'दुष्टांचे निर्दालन आणि सुष्टांचे संगोपन' तो त्यातच आता गुंतून गेला होता. त्याने त्यासाठी महाभारत युद्ध घडवले, अर्जुनाला उपदेश केला, तो भगवद्गीता या नावाने विख्यात आहे. त्यात त्याने कर्माचा सिद्धांत सांगितला, पण भक्तीचा नाही. कारण युद्ध करताना कर्म करणे हे जरूरीचे होते, हा विवेक त्याला होता.

त्यानंतर राधेची आणि कृष्णाची भेट बऱ्याच काळात झाली नव्हती; पण कृष्ण राधेला कधीच विसरला नाही. झोपेतून जाग आल्याक्षणी सुद्धा त्याच्या तोंडी 'राधा' हाच शब्द असे असे म्हणतात. पण तरीसुद्धा तो पुन्हा कधीही वृंदावनाकडे वळला नाही.

शेवटी राधा जेव्हा सगळ्या प्रापंचिक कर्तव्यातून मोकळी झाली, तेव्हा ती द्वारकेत आली. जणू त्यावेळी ती कृष्णाची परीक्षा घ्यायलाच आली असावी. त्याला आपली आठवण तरी आहे की नाही, हे बघायला आली असावी. पण कृष्ण अर्थातच तिला विसरला नव्हता. देव भक्ताला कधी विसरतो का? शक्यच नाही. त्याने तिला अतिशय प्रेमाने द्वारकेतच ठेऊन घेतले. तिची इच्छा तिला विचारली, तेव्हा राधेने पुन्हा एकदा त्याला मुरली वाजवायला

सांगितली. तिची आता फक्त तेवढीच इच्छा राहिली होती. कृष्णानेही ही तिची इच्छा पूर्ण केली. त्याने तिच्यासाठी म्हणून अखंड बासरी वादन केले. त्याच्या बासरीची ती दिव्य धून ऐकता ऐकताच राधा अनंतात विलीन झाली. पूर्णपणे कृष्णमय होऊन गेली. स्वत:च्या पार्थिव शरीराचा त्याग करून ती कृष्णात मिसळून गेली. आता तिने ते अद्वैत साधले, ती मुक्त झाली.

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे**

मोबा. ९९२००५८७०५

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**– अध्यक्ष**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

## हार्दिक अभिनंदन !



कु. स्वरदा दत्तात्रय आपटे, रामानंदनगर, कोल्हापूर ही शिवाजी विद्यापीठाच्या एल.एल.एम. परीक्षेत गुणानुक्रमे द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. ती सध्या पुणे येथे एअरटेल कंपनीत लीगल असोसिएट या पदावर कार्यरत आहे.

## हे कालचक्र अखंड फिरते आहे...

**न गणती कशाची, न पर्वा कुणाची,**
**न महान येथे कोणी, न कोणी लहान,**
**क्षणा क्षणाला पुढे जात आहे,**
**हे कालचक्र अखंड फिरते आहे...!**

**न राष्ट्राची पर्वा, न त्रिखंडाची तमा,**
**भरली वेळ ज्याची तया नाही क्षमा,**
**लक्ष्मण रेषा याची अमर्याद आहे,**
**हे कालचक्र अखंड फिरते आहे...!**

**न माहिती कोणा, न अंदाज याचा,**
**न गणितात हे, न प्रमेयात बद्ध,**
**अनंत काळ हे गतिमान आहे,**
**हे कालचक्र अखंड फिरते आहे...!**

**न जन्माचा आनंद, न मृत्यूचे दुःख,**
**काळाच्या कराल दाढेखाली**
**साक्षात रवीकरही झिजतो आहे,**
**हे कालचक्र अखंड फिरते आहे...!**

**आप, तेज, वायू, क्षुद्र सर्व काही,**
**विश्वातील सारे याचेच दास आहे,**
**क्षितिजपलिकडे हा काळ धावताहे,**
**हे कालचक्र अखंड फिरते आहे...!**

**– मंदार पानवलकर.**

# गुढी पाडवा - एक सांस्कृतिक उत्सव

प्राचीनता-पाडवा-गुढीपाडवा. साडेतीन मुहूर्तापैकी एक पूर्ण मुहूर्त म्हणून या दिवसाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या वस्तूमात्रानेही आपल्या नियोजित कार्याला याच दिवशी सुरुवात केली. जगाच्या निर्मितीनंतर कालगणनेलाही गुढीपाडव्यादिवशी सुरुवात झाली.

प्रभू रामचंद्राने वालीच्या त्रासातून दक्षिणेडील प्रदेश मुक्त केला. त्यासमयी जनतेने गुढ्या तोरणे उभी करून आनंदोत्सव केला. तो दिवस गुढी पाडव्याचा. १४ वर्षे वनवास भोगून प्रभू रामचंद्राने याच दिवशी अयोध्या नगरीत प्रवेश केला.

महाभारतातील प्राचीन ग्रंथात वैशंपायन ऋषींनी जनमेजय राजाला कथा सांगितली.

चेदी देशाचा राजा वसू, राज्याचा त्याग करून अरण्यात तपश्चर्येसाठी गेला. भगवान इंद्र प्रसन्न होऊन त्यांनी वसू राजाला पृथ्वीचे पालन करण्यासाठी एक वेळूची काठी दिली व तिला सुशोभित करून वसू राजाने काठीची पूजा केली. तो दिवस गुढीपाडवा !

या गुढीला ब्रह्मध्वज असेही म्हणतात. त्यामुळे गुढीतोरणे उभी करून, ध्वज उभे करून आनंदोत्सव करण्याची प्राचीन परंपरा गुढी पाडव्याला प्राप्त झाली आहे.

**गुढीची परंपरा :-** या दिवशी वडीलधाऱ्या पुरुषांनी वेळूची/ बांबूची मोठी काठी धुऊन स्वच्छ करून घ्यावी. एका टोकाला रेशमी वस्त्र, चांदीचे, पितळेचे, तांब्याचे चंबूच्या आकाराचे पात्र पालथे घालावे, कडूलिंबाचा पाला, चाफ्याची पांढरी फुले अथवा फुलांची माळ, साखरेची माळ बांधून घरासमोर उंच जागी, अंगणात गुढी उभारावी. 'ॐ ब्रह्मध्वजाय नम:' या मंत्राने गुढीची षोडशोपचार पूजा करावी. सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी ही गुढी, हा ब्रह्मध्वज खाली उतरवावा, अशी प्रथा आहे.

**गुढीची उभारणी :-** गुढी पाडव्याला कडुनिंबाची भाजी खाण्याची पद्धत रूढ आहे. आयुर्वेद शास्त्रात कडुनिंबाचे महत्व अधिक आहे. कडुनिंबाला अमृतफळ असे म्हणतात. चैत्र महिन्यात वसंत ऋतूची सुरुवात फाल्गुन महिन्यातील हेमंत ऋतूमुळे व त्या दोन्ही ऋतूतील सूर्याच्या दाहक किरणांमुळे पित्ताशय, मूत्राशय, भूक मंद होणे, घाम येऊन अशक्तपणा येणे यांसारख्या व्याधी उद्‌भवतात. त्याकरता कडूनिंबाचा रस आरोग्यदायी मानला आहे.

**कडूनिंबाची गोड कहानी :-** गुढीला बांधलेली गोड साखरेची माळ व कडुनिंबाचा पाला हा जीवनातली कडू व गोड प्रसंगाला एकत्रित तोंड देण्याची कदाचित शिकवण देत असावा. 'चांदोबा, चांदोबा भागलास का? लिंबोणीच्या झाडामागे लपलास का?' ही बालकविता लहान मुलाला चंद्राचा शीतल शांतपणा व लिंबोणीच्या नावामुळे मुलाची भूक वाढवून लहान मुलाला घास भरवीत असल्याचे चित्र आपण आजही पाहतो. 'निंबति सिंचत स्वास्थ्यम इति निंबा:'

**नूतन संवत्सर :-** सातवाहन ऊर्फ शालिवाहन राजाने स्वत:च्या नावे इसवी सनानंतर ७८ वर्षांनी शक सुरू केला. त्याला शालिवाहन शक असेही म्हणतात. हे शक गुढीपाडव्यालाच सुरू केले. सृष्टीचक्रातील सहा ऋतूंची चक्रे पूर्ण होऊन पुन्हा चैत्र पाडव्याला वसंत ऋतूने हे कालचक्र पुन्हा कार्यान्वित होते. एकूण ६० संवत्सरे आहेत. भगवान नारद त्यांची भार्या नारदीस ६० पुत्र झाले. त्यांच्या नावाची ही संवत्सरे असल्याचे पौराणिक उल्लेख आढळतात. १ ले नांव प्रभव व शेवटचे नांव क्षय.

**पंचांग :-** भारतीय पंचांगाची सुरुवात चैत्र शुद्ध प्रतिपदेने होते. महाराष्ट्रात एकूण १८ पंचांगे प्रसिद्ध होतात. पंचांगाचा कालावधी व निर्मितीचा काळ ३००० (तीन हजार) वर्षांपूर्वीचा आहे. सन साली १ल्या शतकात महाराष्ट्र प्रांतातील राजा पलुमाची सातकर्णी याने आपल्या नांवे नवीन

शालीवाहन शक सुरू केले. १ ला शककर्ता राजा धर्मराज, दुसरा उज्जैनीचा राजा विक्रम, तिसरा पैठणचा राजा शालीवाहन, ४ था सिंधु देशाचा राजा विजयाभिनंद, ५ वा धारातीर्थीचा राजा नागार्जुन व ६ वा रायगडचा राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना शककर्ते म्हणून ओळखले जाते.

तिथी, वार, नक्षत्र, योग व करण ही पंचांगाची पाच प्रमुख अंगे. ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र यावर आधारित पंचांगाची निर्मिती आहे. श्री. लाटकर, दाते, रूईकर, राजेंदेकर, पारनेरकर, देशिंगकर, टिळक वगैरे संस्थापकांनी पंचांगे प्रसिद्ध केली आहेत. १८ भाषेत पंचांगे प्रसिद्ध होतात. सर्वांच्या पद्धतीमध्ये एकसूत्रता आढळते.

**चैत्रा गौरी :–** चैत्र पाडव्याला गौरीची तीज असते. यावेळी गौरी माहेरपणास येते व ती अक्षय्यतृतीयेपर्यंत वास्तव्य करते, अशी पौराणिक आख्यायिका. त्यामुळे या गौरीच्या आगमनाप्रीत्यर्थ या महिन्यात घरोघरी माहेरवाशिणी हळदीकुंकू, भेटीगाठी, चर्चासत्रे, महिलांचे खेळ, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने गुढी पाडव्यापासून या सत्राला सुरुवात करतात. काकडी, पन्हे, चाफ्याची फुले, आंब्याची कोशिंबीर, अत्तर, गुलाबपाणी, मोगऱ्याचे गजरे, बत्तासे मांडून गौरीची आरास केली जाते.

**प्रभू रामजन्मोत्सव :–** १४ वर्षे वनवास भोगून प्रभू रामचंद्राने गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर पुन्हा अयोध्या नगरीत आगमन केले. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते रामनवमी या नऊ दिवसात सर्वत्र प्रभू रामचंद्रांचा नवरात्रौत्सव साजरा होतो. रामनवमीला ठिकठिकाणी रामजन्मकाळ व रथोत्सवाचे आयोजन केले जाते.

**जोतिबाच्या नावाने चांभगलं :–** श्री महालक्ष्मीचा सेनापती जोतिबा. करवीर नगरीच्या उत्तरेला डोंगरावर वाडी रत्नागिरी या भागात जोतिबाचे वास्तव्य अतिप्राचीन आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून गणल्या गेलेल्या जोतिबाच्या नावाने चैत्रीच्या पाडव्याच्या निमित्ताने भक्तांचे खेटे सुरू होतात. चैत्र शुद्ध पौर्णिमेला मोठा उत्सव असतो. सारा आसमंत जोतिबाच्या नावाने दुमदुमून जातो. गुलाल, खोबऱ्याची उधळण, मानाच्या सासन काठ्या, टाळ, मृदंग वाद्यांच्या गजरात लाखो भक्तांची यात्रा भरली जाते. चैत्र कृष्ण प्रतिपदेला श्री महालक्ष्मी रथोत्सवाचे आयोजन केले जाते.

**सरस्वतीचे पूजन :–** गुढी पाडवा बालमनाचा आनंदोत्सव. चिमुकली, चिमुरडी मुले–मुली आपल्या घरातून दगडी, पत्र्याच्या पाटीवर गुढीचे चित्र काढून शाळेत जातात. निरागस मनाने ही हसरी बालके गुढीच्या चित्राचे मनोभावे पूजन करतात. घरातील वडिलधारी माणसे, शाळेतील गुरुजनांना वंदन करून आयुष्यभर ज्ञानाचा कण नि कण् गोळा करण्याचा, ज्ञान यज्ञाचा श्रीगणेशा सुरू करतात. नवे कपडे, शुचिर्भूतता, गोडधोड पदार्थ, चुरमुरे, खोबरे याचा मनसोक्त आस्वाद घेऊन सरस्वतीचे पाईक होण्यात धन्यता व्यक्त करण्याचा आनंद द्विगुणीत होतो.

**नव्याची सुरुवात :–** चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा, कार्तिक शुद्ध प्रतिपदा दीपावली पाडवा, अश्विन शुद्ध नवमी विजयादशमी, दसरा व वैशाख शुद्ध तृतीया हे हिंदू पंचांगातील साडे तीन मुहूर्त. या मुहूर्तावरील कोणतीही सुरुवात निर्वेध यशस्वी होते. नवे उद्योग, नवे व्यवसाय, नवी दिशा, नवीन निवासस्थान प्रवेश यांसारख्या अनेक नवनवीन उद्योगाची सुरुवात पाडव्याच्या शुभमुहूर्तावर होते. नव्या क्षितिजाची शुभ सुरुवात करून अनेक नव्या संकल्पनांच्या शुभ कार्याची सुरुवात या मुहूर्तावर होते.

**घरोघरी आनंद :–** चैत्र शुद्ध पाडव्याच्या मुहूर्तावर घरातील संपूर्ण वातावरण मंगलमय होते. साफसफाई, सडा रांगोळी, अंगणात गोपद्म, चंद्र, सूर्य, गदा, पद्म, स्वस्तिक, कमळ, गरूड, फणी, करंडा अशा विविध प्रकारच्या रांगोळ्या, गुढीपूजन, ब्रह्माची पूजा, ग्रंथ वाचन, पंचांग वाचन, पाणपोईची सुरुवात, नवीन कपडे, धार्मिक सांस्कृतिक मंगलमय वातावरण, श्रीखंड–पुरी, पुरणपोळी, बासुंदी, जिलेबी, साखरभात वगैरे पंचपक्वान्नांचे, मिष्टान्नांचे भोजन यामुळे सारे वातावरण मंगलदायी होते.

**(पुढील मजकूर पान नं. ११ वर पाहा...)**

# म्हणींचे म्हणणे

## एक ना धड भारंभार चिंध्या

'आई ग... अरे पडले असते ना मी... काय सगळीकडे पसारा केलाय, तो आवरायचा कुणी? मला काय एवढं एकच काम आहे का? घरात रहाते म्हणजे चौवीस तास फक्त काम काम आणि काम, इतकंच करू का?' वैतागलेल्या सुरात निमा जोराने बोलत होती. नयन हाताची घडी घालून शांत बसला होता. 'अहो, तुम्ही नुसते बघत काय बसलात? तो तुमचा कार्टा काय करतोय बघा जरा.'

नयन समजला आता गाडी माझ्यावर घसरणार त्याआधीच काहीतरी केलेल बरं. तो हसला आणि शांतपणे म्हणाला, 'मी बघतो, तू आवर जा स्वयंपाकाचे. 'हुँ... असं करत निमा तरातरा स्वयंपाक घरात निघून गेली. नयनने चिनू आणि तनूला हाक मारली. अरे, हे सगळं आवरुया. या पटपट. आपण स्वच्छ करून टाकू हॉल. पसारा एक बास्केटमधे किंवा खोक्यात भरूया. चला पटापट !'

चिनू, तनू दोघेही बाबांच्या मदतीने खेळणी, पत्ते, बॉल, मॅक्यॅनो, पझल्स, गोट्या, काचा, अनेकविध रंगीत कागद... सगळे एकत्र करून एक एक करत खोक्यात भरत होते.

हे सगळं चालू असतानाच आजी आली. तिने वेगळाच सूर लावला. 'अरे पोरानों, काय तुमचं हे काम? एक ना धड भाराभर चिंध्या... कुठलीही गोष्ट नीट करताच येत नाही का तुम्हाला? आणि नयन, अरे तू बाप ना यांचा? त्यांना ओरडायच सोडून तुझं काय चाललय हे?'

हातातले खेळणे बाजूला ठेवत नयन आजीपुढे उभा राहिला. म्हणाला, 'माते, शांत हो. आत्ताच रणदुर्गा तोफ डागून गेलीय. आता तू गोळीबार नको करू !' बाबाचा एकूण आवीर्भाव बघून मुलं हसायला लागली. तशी आजीने एक चापट मारली नयनला आणि म्हणाली, 'तूच असा तर मुलं वात्रटपणा करणारच. अरे एक एक काम पूर्ण करावं.' अन् हसत हसत आतमधे निघून गेली.

हुश्श ! नयनने मुलांकडे बघत डोळा मारला अन् सगळा पसारा भरून हात धुवायला मुलं बेसिनवर पळाली. नयनपण पाठोपाठ हात धुवायला गेला.

संध्याकाळच्या परवचा म्हणून झाल्या. चिनूने पाढे म्हणायला सुरुवात केली. तनू उगीच त्याच्या मागून तीन त्रिक, चारा पंचे म्हणत होती. कानावर पडणारा आकडा म्हणायचा हे नक्की. आजोबांनी तनूला गंमतीने टपली मारली अन् म्हणाले, 'लबाडे, दादाची नक्कल करतेस? त्याला अभ्यास करायचाय म्हणू दे त्याला.' 'तुझं एक नाही काही. जा चित्रांचं पुस्तक आण आपण चित्र बघू.'

त्या दोघांचा असा संवाद चालू असतानाच चिनू म्हणाला, 'आजोबा, आजोबा मला आज मारुतीची गोष्ट सांगा तुम्ही. मला ऐकायचीय. त्याच्या शेपटीला आग लावतात तरी त्याला भाजत नाही ते कस काय?' इतक्यात निमा तिथे आली.' चिनू, अरे पाढे म्हणत होतास ना? याचं ना एक धड काही नसतं. आधी पाढे पुर्ण कर.' सूचना देऊन ती हातातले काम पूर्ण करायला गेली.

आजोबांनी चिनूला पाढे पूर्ण कर मग सांगतो गोष्ट असं सांगितली अन् चिनूने नऊचा पाढा म्हणायला सुरुवात केली. पाढे संपत आले तसं म्हणाला, 'आजोबा, आज सकाळी आजीपण म्हणाली... एक ना धड भाराभर चिंध्या... म्हणजे काय? या भाराभर चिंध्या कसल्या? आम्ही तर खेळणी भरत होतो. चिंध्या तर कापडाच्या असतात ना? कापडाचं काही काम केलच नव्हतं, पण मग?' आजोबा हसले. त्यांनी अंदाज बांधला काय झाले असेल. मग ते चिनूला म्हणाले, 'अरे खूप वर्षापूर्वी एक शिंपी कपडे शिवत होता. त्याला अगदी तातडीने कपडे शिवून द्यायचे

होते. म्हणून त्याने काय केलं. एकाचा शर्ट, एकाचा लेंगा, एकाचा झब्बा. असं एकत्र कापून घ्यायचं म्हणून गडबड केली. पण त्या गडबडीत सगळ्या कापडाच्या चिंध्या मात्र झाल्या. मग काय, कुठलाच कपडा शिवून झालाच नाही. काही काही लोकांना काम करायला सांगितले की ते कुठलही काम पूर्ण करत नाहीत. एक सुरू करतात, ते अर्ध ठेवतात. दुसरं करतात, ते अपुरे ठेवतात तिसरे करायला घेतात. असं झालं की कुठलेच काम नीट होत नाही. म्हणून आजी म्हणाली तसं.'

चिनूला किती कळलं माहिती नाही. पण आजोबा मात्र मनात म्हणाले, 'शिंपीदादा, तुमचा आधार घेऊन अर्थ सांगितलाय बरं, माफ करा !' चिनूने मान हलवली अन् 'आजोबा मारुतीची गोष्ट सांगा आता' म्हणून तिथेच त्यांना चिकटून बसला. लंका दहनाची गोष्ट सांगत सांगत शेवटाकडे आल्यावर आजोबा म्हणाले, 'मारुतीची शेपटी एवढी मोठी एवढी मोठी झाली की तिला गुंडाळण्यासाठी चिंध्या कमी पडायला लागल्या.' हे वाक्य ऐकलं मात्र अन् चिनू टाळी वाजवत मोठयाने उडी मारत म्हणाला, 'येस, आता कळलं मला तो शिंपी कापड कापायला कसा चुकला ते. त्या चिंध्या मारुतीच्या शेपटीला गुंडाळायला मिळायला हव्यात म्हणून. 'आजी आजी, ए आजी, तुझ्या एक ना धड भाराभर चिंध्या... इकडे सापडल्या बघ.' तो धावत घरात गेला. आजोबा मात्र कपाळावर हात मारून म्हणाले, 'हे असं होतं, एक ना धड, भारंभार चिंध्या! ना धड ती गोष्ट समजली, ना ही! उद्या नीट पुन्हा एकदा एकच गोष्ट छानपणे सांगायला हवी. अन् ते स्वतःशीच मनमुराद हसू लागले!

**- वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

## गुढी पाडवा - एक सांस्कृतिक उत्सव

**(पान नं. ९ वरून पुढे...)**

**खरेदीसाठी झुंबड :-** चैत्र पाडव्याच्या शुभमुहूर्तावर ठिकठिकाणचे महत्त्वाचे रस्त माणसांनी फुललेले दिसतात. कोल्हापुरात श्री महालक्ष्मी मंदिर, महाद्वार पथ, ताराबाई पथ, भवानी मंडप, सराफ बाजार, गुजरी कट्टा, शिवाजी पुतळा, रंकाळा मार्ग, शाहूपुरी, राजारामपुरी, व्यापारी पेठ, लुगडी ओळ, पापाची तिकटी हे सर्व मार्ग अक्षरश: लोकांच्या गर्दीने फुलून जातात.

कपडे, साड्या, नवीन वस्तू, दागिने, मंदिरातील विविध देवदेवतांचे दर्शन, नवीन जागा, नवीन कार्यालये, नवे उद्योग, नव्या व्यवसायासाठी कंपनी, बिल्डर, दुकानदार, व्यापारी, उद्योजक, डेव्हलपर्स सज्ज असतात. लहान मुलांपासून तरुण-तरुणी, वृद्धांपर्यंत सारेजण आपआपल्या परीने या उत्सवात धावत असतात. काहीतरी नवीन खरेदी होतेच. फ्रीज, टीव्ही, स्कूटर, मोटारगाड्या, रेडिओ, पंखे, अलंकार, साड्या, कापडे, कपडे, वॉशिंग मशीन यांसारख्या खरेदीसाठी झुंबड उडते.

**- नंदकुमार मराठे**

मोबा. ९९६०६३६०४०

**- बोडण सोहळा -**

**आपल्या समाजाचा कुलाचार म्हणजे बोडण सोहळा !**

**यावर्षी संस्थेतर्फे सार्वजनिक बोडण सोहळा ५ मार्च व १९ मार्च २०२३ रोजी संस्थेचे 'रमा-दामोदर सभागृह' येथे करणेचे ठरवत आहोत. बोडणाची सर्व व्यवस्था संस्थेतर्फे करणेत येणार असून खर्च प्रतिबोडण रु. ३५००/- इतका व एक जादा पान जेवण रु. २५०/- इतका येईल.**

**(एका बोडणास ४ सवाष्ण व १ कुमारिका )**

**संपर्क : कोल्हापूर चित्पावन संघ, मंगळवार पेठ, कोल्हापूर. फोन : ०२३१-२५४६२२५**

**श्रीमती वासंती लिमये : ९१५८८५९६०३ * सौ. संगीत आपटे : ८१४९५८००३४**

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

– व्यवस्थापक

**अध्याय ३ : कर्मयोग**

**श्रीभगवानुवाच ।**

**कर्मरंभा न करिती ।**
**आणि सर्व कर्मे उगीच त्यजिती ।**
**पुरुष मोक्ष न पावती । तया सिद्धी नाही ।।४।।**
न कर्मारंभ टाळूनि लाभे नैष्कर्म्य तें कधीं ।
संन्यासाच्या क्रियेनें चि कोणी सिद्धि न मेळवी ।।४।।

**कोणी कर्महीन नसती ।**
**क्षण एक कर्म न संडिती ।**
**काय असे कर्माची स्थिती ।**
**प्रकृतीपासूनी निपजती सर्व कर्मे ।।५।।**
कर्माविण कधीं कोणी न राहे क्षण–मात्र हि ।
प्रकृतीच्या गुणीं सारे बांधिले करितात चि ।।५।।

**कर्म इंद्रियातें दंडी । आणि मन कल्पना न संडी ।**
**तया नाही विषयाचि सांडी ।**
**म्हणोनी मूर्ख म्हणावें ।।६।।**
इंद्रियें करिती कर्म मूढ त्यांस चि रोधुनी ।
राहतो भोग चिंतूनि तो माथ्याचार बोलिला ।।६।।

**जो इंद्रिय मने नेम करी स्वभावी ।**
**इंद्रिया हाती कर्मे करवी ।**
**कर्म फळाची आशा न धरावी ।**
**तो श्रेष्ठ म्हणजे अर्जुना ।।७।।**
ज़ो इंद्रियें मनाने तीं नेमुनी त्यांस राबवी ।
कर्म–योगांत नि:संग तो विशेष चि मानिला ।।७।।

**तरी तूं वर्णाश्रम कर्म करी ।**
**कर्म श्रेष्ठ हे अवधारी ।**
**न करिता कर्म त्यजिसी जरी ।**
**देहावसानी सिद्धी नाही ।।८।।**
नेमिलें तूं करीं कर्म करणें हें चि थोर कीं ।
तुझी शरीर–यात्रा हि कर्माविण घडे चि ना ।।८।।

**यज्ञेविण ऐशी श्रुती ।**
**तया वेगळी कर्मे अन्यत्र अर्पिती ।**
**म्हणोनि बंधाते पावती । सकळ लोक ।।९।।**
यज्ञार्थ कर्म सोडूनि लोक हा बांधिला असे ।
यज्ञार्थ आचरीं कर्म अर्जुना मुक्त–संग तूं ।।९।।

**म्हणोनि तूं अधीकु धनंजया ।**
**कर्माधिकार आहे तुज करावया ।**
**फलरी त्यजुनिया । आचरावे कर्म ।।**
**ब्रह्मयाने यज्ञसृष्टि केली ।**
**मग आशीर्वादाची उत्तरे बोलिली ।**
**तुम्ही बहु यज्ञ करा वहिली ।**
**सर्व कामना पुरतील ।।१०।।**
पूर्वीं प्रजेसवें ब्रह्मा यज्ञ निर्मूनि बोलिला ।
पावा उत्कर्ष यज्ञानें हा तुम्हां काम–धेनु चि ।।१०।।

**तुम्ही भावे देवाते पूजा ।**
**ते तुम्हा प्रसन्न होती सहजा ।**
**परस्परे तुमचिया भावे काजां । श्रये देतील ।।११।।**
रक्षा देवांस यज्ञानें तुम्हां रक्षोत देव ते ।
एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि ।।११।।

## शब्दकोडे माहे मार्च २०२३

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ✕ | २ | ३ | | ✕ | ४ | ✕ |
| ५ | | ✕ | | ✕ | ६ | | ७ |
| | ✕ | ८ | | ९ | | ✕ | |
| १० | ११ | | ✕ | १२ | | १३ | ✕ |
| १४ | | ✕ | १५ | | ✕ | १६ | १७ |
| ✕ | १८ | | | ✕ | १९ | | |
| २० | | ✕ | २१ | | | | ✕ |

**आडवे शब्द :**

१. पाच पांडवांपैकी एकाचे नाव, ५. मधमाश्यां-पासून मिळणारा गोड पदार्थ, ६. यज्ञोपवीत, ८. कठीण, त्रासदायक, १०. देवाला जागे करण्या-साठी पहाटे म्हटले जाणारे गाणे, १२. निशाण, ध्वज, फेटा, १४. मासा, बारा राशींपैकी एक रास, १५. वर्ष, साल, १६. शिक्षा, सजा, १८. फुटून बाहेर पडलेला, १९. थडगे, समाधीस्थळ, २०. दक्षिण भारतामधील तामिळनाडू राज्यातील थंड हवेचे ठिकाण, २१. अंदाजाने, साधारणत: काढलेलं.

**उभे शब्द :**

१. यूद्धभूमी, ३. लाकडे फोडण्याचे हत्यार, ४. पैसा, ६. कठीण, टणक, ७. बासरी, पावा, ८. हसताना गालावर पडलेला खळगा, ९. आग ओकणारा सूर्य, ११. पानालाच पाने फुटणारी एक वनस्पती, १३. कल्पित कथा, १५. उत्कृष्ट, लाजवाब, १७. भीती/भय यांना हिंदी प्रतिशब्द, १९. सोन्याची अथवा रुप्याची शुद्धता ठरवण्या-साठी विशिष्ट दगडावर घासून रेघ मारणे.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. विमानाचे जेट इंजिन बनवण्यासाठी कोणता धातू वापरतात? का?

२. १९२५ साली महात्मा गांधींच्या कार्यात सहभागी होण्यासाठी आलेल्या ब्रिटिश महिलेचे नाव काय होते? नंतर गांधीजींनी या मानस कन्येचे नामांतर काय केले?

३. दरवर्षी ‘आंतरराष्ट्रीय जल दिन’ कधी साजरा करतात?

४. दार्जिलिंगमध्ये सूप व नूडल्सपासून बनणाऱ्या आंबट, गोड व तिखट चव असलेल्या पदार्थाचे नाव काय आहे?

५. एलईडी यष्ट्यांची कल्पना क्रिकेट या खेळात कधी आली?

६. कोणती पाककृती ओरिसात उन्हाळ्यात जास्त बनवली जाते?

७. जिराफ या प्राण्यावर लिहिलेले पहिले पुस्तक कोणते? ते कोणी व कधी प्रसिद्ध केले?

८. कोणत्या देशाला ‘लँड ऑफ आइस अँड फायर’ म्हटले जाते?

९. शल्यचिकित्सेचा जनक कोणाला मानले जाते?

१०. मज्जासंस्थेशी निगडित कोणता रोग शेळ्या-मेंढ्यांना होतो?

(उत्तरे अन्यत्र पहा.) **– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

### शब्दकोडे माहे फेब्रुवारीचे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ दा | २ स | ✕ | ३ ह | क | ४ ना | ५ क |
| ६ द | ह | श | त | ✕ | ७ च | व |
| ८ र | म | ✕ | ९ ब | १० स | ✕ | ळी |
| ✕ | ११ त | १२ मा | ल | प | त्र | |
| १३ भ | ✕ | न | ✕ | क | ✕ | १४ फ |
| १५ व | १६ ख | व | १७ ख | ✕ | १८ पा | रा |
| ✕ | वा | ✕ | १९ त | ल | वा | र |

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक एकविसावा)

८

आई-बाबांचा दशक्रिया विधी करायचं ठरवलं खरं; पण ते तेवढं सहजशक्य नव्हतं. एकतर कोणालाच काही माहीत नव्हतं. गावात कुणी विचारल्यावर सांगतील, अशी आशा नव्हती. कोणी मार्गदर्शन करेल म्हणावं, तर तेही शक्य नव्हतं. बरं त्यासाठी लागणारा शिधा, सामानसुमान उभं करायचं कसं; हाही प्रश्न होताच, पण अशा वेळी पुन्हा धावून आल्या त्या कावेरीअक्काच. निवृत्ती-ज्ञानेशानं आपला विचार त्यांच्याजवळ बोलून दाखवला आणि कावेरीअक्कांचे डोळे भरून आले. ''एवढ्या लहान वयात ही एवढी समज? परमेश्वरा काय म्हणून या मुलांना तू असं अनाथ आणि पोरकं केलंस? या मुलांचा समंजसपणा बघून त्या दुर्दैवी आई-बाबांचे डोळे तरी निवले असते !'' त्यांच्या मनात मायेचा उमाळा दाटून आला. अख्खं गाव विरोधात गेलं तरी चालेल; पण या मुलांच्या पाठी आपण ठामपणे उभं राहायचंच राहायचं, असा मनोमन निश्चय त्यांनी केला आणि मग त्यांना बरं वाटलं. कावेरीअक्कांनी खात्री घेतली, म्हटल्यावर निवृत्ती-ज्ञानेश्वर निश्चिंत झाले. सोपानाला दशक्रिया विधी म्हणजे काय, हे थोडं-थोडं कळत होते; पण मुक्ती, ती तर अगदी लहान होती. तरीपण तिला समजावून सांगणं भाग होतं. नाहीतर तिनं तिथंच गंगेच्या घाटावर हजार प्रश्न विचारले असते; पण हा सगळा विधी तिला समजावून कसा सांगणार? दोघांनी बराच खल केला आणि हे काम त्यांनी सोपानावर सोपवलं. आपल्या भावांनी आपल्यावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे, हे सोपानच्या लक्षात आलं, आणि ही जबाबदारी, हे काम सोपं नाही, याचीही त्याला कल्पना होती, कारण मुक्ता वयानं लहान असली, तरी ती अतिशय बुद्धिमान होती आणि प्रत्येक गोष्टीचं स्पष्टीकरण, प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तिला समाधानकारक मिळेपर्यंत ती प्रश्न विचारत राहते, हे सोपानाला ठाऊक होते. म्हणजे आता मुक्तीला समजावून सांगण्यापूर्वी काय सांगायचं, कसं सांगायचं, याचा विचार करायला हवा होता. तिच्या बुद्धीला पेलेल, झेपेल अशाच पद्धतीनं हळुवारपणे सांगावं लागणार होतं. सोपाना त्याची तयारी मनातल्या मनात करू लागला.

आई-बाबांचा दशक्रिया विधी करण्याचं एकदा नक्की झाल्यावर निवृत्ती आणि ज्ञानेश्वर या कामाच्या मागे लागले. गावातील कुणी ब्राह्मण येणं शक्यच नव्हतं. 'मरणान्ती वैराणी' हे वचनही सगळे विसरले होते; पण कावेरीअक्कांचं पाठबळ आणि त्यामुळे त्यांच्या चिरंजीवांनी, विनायकबुवांनी दिलेला मदतीचा हात, एवढा आधार या दोघांना पुरेसा होता. माधुकरीच्या वेळी कोरडा शिधाच देण्याची विनवणी करून त्या दोघांनी थोडाफार शिधा गोळा केला आणि दशक्रिया विधीसाठी लागणारं इतर सामान कुठून-कुठून गोळा करण्यासाठी पुन्हा दोघं बाहेर पडले. दिवसभर एवढं मुक्तीच्या लक्षात आलं होतं. मध्येच ते दहावा दिवस, पिंडदान असलं काहीतरी बोलत होते; पण त्याचाही अर्थ मुक्ताला कळत नव्हता. तिला हे सगळं सोपानाला विचारायचं होतं, कारण तोच तिला समजावून सांगू शकला असता. पाठची भावंडे असल्यामुळे तिचं सोपनाशीच चांगलं गुळपीठ हातं. अर्थात लटकी भांडणंही तेवढीच व्हायची; पण याचा उलगडा सोपानाकडून करून घ्यायचा, म्हणून ती त्याची वाट बघत होती. तोही आज कामात दिसत होता. माका, पांढरी फुलं गोळा करण्याच्या नादात होता. त्याचं ते काम संपण्याची मुक्ता वाट बघत होती. त्यातही तो ही पांढरी फुलं आणि माका कशासाठी गोळा करत होता, तेही तिला विचारायचं होतं. एकदाचं सोपानाचं ते काम संपलं आणि बाहेरच्या डोणीवर हात-पाय धुऊन तो आत आला. आईची शिकवण लक्षात ठेवलेली मुक्ता गडूतून पाणी घेऊन

आली आणि तिने ते सोपानाला दिलं. तिचा त्या वेळचा समंजसपणा, तिची शांत मुद्रा बघून सोपानाला वाटलं, हीच योग्य वेळ आहे तिला दशक्रिया विधी समजावण्याची. त्यानं तिच्या हातातून गडू घेतला. पाणी प्यायला. म्हणाला ''मुक्ते, तुला कसं कळलं गं मला तहान लागली आहे ते? बरोबर पाणी आणून दिलंस बघ. मन शांतवलं माझं.'' आपलं कौतुक ऐकून मुक्तीचा चेहरा खुलला. ''आईनंच मला सांगून ठेवलंय. कुणी बाहेरून आलं की, त्याला पाणी द्यायचं म्हणून ! ते लक्षात आहे माझ्या !'' सोपानाला धागा गवसला. मुक्तीच्या हाताला धरून तिला आपल्याजवळ बसवून तो म्हणाला, ''मुक्ते, मला तू पाणी आणून दिलंस, मला बरं वाटलं, माझं मन शांतवलं. असंच आपण आपल्या आई-बाबांना पाणी द्यायचं आहे. म्हणजे त्यांचं मन शांतवेल !'' त्याचं बोलणं ऐकून मुक्ता चमकली. क्षणार्धात तिचा चेहरा लाल झाला. डोळ्यांत पाणी भरलं. नाकपुड्या थरथरायला लागल्या. ओठातून दबला हुंदका बाहेर पडला. थरथरत्या आवाजात ती म्हणाली ''दाऽऽदा? आपल्या आई-बाबांऽना पाणी द्यायचं? पण... ते... तर...!!! ते ...तर?'' तिला पुढं बोलवेना. सोपानानं तिची अवस्था ओळखली. तिचा चेहरा आपल्या हाताच्या ओंजळीत पकडून म्हणाला, ''होय छकुले, ते तर जिवंत नाहीत, असंच ना? आपण त्यांची मुलं आहोत ना? मग ते जिवंत नसले, तरीही आपण त्यांना पाणी देऊ शकतो. त्यांना अन्न देऊ शकतो.'' सोपान बोलत होता आणि मुक्ती डोळे विस्फारून ऐकत होती. हे सगळं सगळं तिला नवीन होतं. माणसं मरतात म्हणजे देवाघरी जातात एवढंच तिला आईनं सांगितलं होतं; पण तिथं देवाच्या घरी त्यांना खायला आणि पाणीसुद्धा प्यायला मिळत नसेल, याचं तिला नवल वाटलं. तिला राहावलं नाही. तिनं सोपानाला प्रश्न विचारला, ''सोपानदादा; पण मेलेली माणसं तर देवाच्या घरी जातात ना? मग तिथं त्यांना देवबाप्पा खायला, पाणी प्यायला देत नसेल?'' ''देवबाप्पा त्यांना पाणी देत असेलच गं ! पण आपल्या मुलांनी पाणी दिलेलं सगळ्या आई-बाबांना आवडतं किनई? म्हणून आपण आपल्या आई-बाबांना अन्न-पाणी द्यायचं. या विधीला श्राद्ध विधी म्हणतात. या विधीच्या वेळी देवबाप्पाच्या घरी गेलेले आई-बाबा अदृश्य रूपानं येतात आणि आपण अर्पण केलेलं अन्न-पाणी घेतात, अशी श्रद्धा असते. अशा श्रद्धेनं केलेला तो विधी असतो, म्हणून त्याला श्राद्ध विधी म्हणतात. आपण आपल्या आई-बाबांसाठी तो विधी दोन दिवसांनी करायचा आहे. त्यासाठी काही बरंच सामान, शिधा वगैरे लागतो. तो आणण्याच्या गडबडीत निवृत्तीदादा आणि ज्ञानादादा आहेत. मीपण मला समजेल, उमजेल आणि जमेल तेवढं करतोय. माझी शहाणी बाई ती ! तुला उमजलं का गं मी काय म्हणतोय ते?'' सोपानाचं सगळं बोलणं, सगळं सांगणं, सगळं सगळं मुक्तीला उमजलं होतं आणि ते तिच्या चेहऱ्यावरून, डोळ्यांतून गालावर ओघळणाऱ्या, आसवांवरून आणि मुडपून हुंदका आवरणाऱ्या ओठावरून स्पष्टपणे प्रतीत होत होतं. सोपानाच्या प्रश्नांवर तिनं काही न बोलता नुसती मान हलवली आणि तिचं ते केविलवाणेपण असह्य होऊन सोपानानं तिला जवळ घेतलं. त्याच्या कुशीत शिरल्यावर मात्र मुक्तीच्या ओठांनी असहकार पुकारला आणि कोंडून ठेवलेला हुंदका अवघं दुःख घेऊन बाहेर पडून मुक्ती रडायला लागली. सोपान तिची समजूत काढत होता. आपल्या परीनं तिला समजावून सांगत होता आणि सांगता-सांगता एक क्षण असा आला, की इतका वेळ मोठ्या माणसांसारखं समजून-उमजून वागणारा, मुक्तीला समजावून सांगणारा सोपान स्वतःच रडायला लागला. आईबाबांबद्दल, त्यांच्या अकाली मृत्यूबद्दल, त्यांच्या देहान्त प्रायश्चित्ताबद्दल, त्यांच्या दशक्रिया विधीबद्दल तटस्थपणे बोलणं आणि तेही चिमुरड्या मुक्तीजवळ, हे किती अवघड आहे, किती कठीण आहे, हे समजण्याइतका सोपानही मोठा नव्हता. मग यातलं असहाय्य केविलवाणेपण त्याला कुठलं उमगणार? नियती निर्दयी खरीच; पण ती क्रूर आणि आकलनापलीकडची असते हेच खरं !

संध्याकाळी निवृत्ती आणि ज्ञानेश्वर परतले. त्याच्या समाधानी चेहऱ्यावरून शिधा-सामानसुमान जमवण्याचं काम नीट पार पडलं असावं, हे सोपानाला कळलं, तर सोपान-मुक्ताचे रडवेले चेहरे, लाल

झालेलं नाक, पाणावलेले डोळे आणि एरवी दोघांच्यात चाललेली एकमेकांच्या खोड्या काढण्याची, चुगल्या सांगण्याची चुरस यांचा नसलेला मागमूस, यावरून सोपानानं मुक्तीला दशक्रिया विधीबद्दल सांगितलं आहे, हे निवृत्ती-ज्ञानेशाला कळलं. काहीही न बोलता दोघांनी सोपान-मुक्ताला जवळ घेतलं आणि आपल्याही डोळ्यांतले अश्रू मुक्तपणे वाहू दिले.

अस्ताचलाला जाणारा सूर्य ते दृश्य पाहण्यासाठी क्षणभर थांबला आणि त्यानंही आपले डोळे मिटून घेतले. त्याच्या चेहऱ्यावरची वेदना धरेला जाणवली. तिच्या अंगाला कंप सुटला. तिची थरथर इंद्रायणीला जाणवली. ती तिच्या लाटांत भिनली आणि सूर्य मावळलेला असतानाही, चंद्र उगवलेला नसतानाही आणि वारा पडलेला असतानाही इंद्रायणीच्या लाटा उसळल्या. इतक्या की क्षणभर वाटलं, प्रलय होतोय की काय? पण कसं कोण जाणे अचानक इंद्रायणीचं पाणी शांत झालं. कदाचित... कदाचित आपल्या लाटा उसळण्यानं आपल्या पोटात विसावलेल्या दोन पुण्यात्म्यांची पार्थिवं पृष्ठभागावर येतील, अशी भीती तिला वाटली असावी. पंचमहातेजांमध्ये उठलेली ही खळबळ काही क्षण उठली आणि शांत झाली. ही चार भावंडं अवघ्या पंचतत्त्वालाच आव्हानं देण्याइतकी मोठी होणार आहेत, याचीच ती झलक असावी. (क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

## हार्दिक अभिनंदन !




कोल्हापूर चित्तपावन संघाच्या कार्यकर्त्या व सभासद सौ सुषमा विठ्ठल जोशी व विठ्ठल जोशी यांचे चिरंजीव निखिल जोशी सीए परिक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन !

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

**दिनविशेष (मार्च २०२३)**
**फाल्गुन - चैत्र शके १९४४-४५**
**प्लवनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**शुक्रवार दि. ३ :** आमलकी एकादशी, **सोमवार दि. ६ :** हुताशनी पौर्णिमा, **मंगळवार दि. ७ :** धूलिवंदन, **बुधवार दि. ८ :** वसंतोत्सवारंभ, **शुक्रवार दि. १० :** शिवजयंती (तिथीप्रमाणे), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुण्यदिन, **शनिवार दि. ११ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.५९), छ. संभाजीराजे बलिदान दिन, **रविवार दि. १२ :** रंगपंचमी, **गुरुवार दि. १६ :** छ.राजाराम महा.पु.ति., **शनिवार दि. १८ :** संत श्री बाळूमामा उत्सव, **सोमवार दि. २० :** अमावास्या, **मंगळवार दि. २१ :** छ.संभाजीराजे पुण्यतिथी, **बुधवार दि. २२ :** गुढीपाडवा, नूतन वर्षाभिनंदन, शोभन संवत्सवारंभ, **गुरुवार दि. २३ :** स्वामी समर्थ प्रकट दिन, **सोमवार दि. २७ :** श्री ज्योतिर्लिंग षष्ठी यात्रा, **गुरुवार दि. ३० :** रामनवमी.

# मुलांचे करिअर आणि पालकांची मानसिकता

करिअर म्हणजे काय? या शब्दाची व्याख्या कुणी सांगू शकेल का अगदी थोड्या शब्दात? खरे पाहिले तर करिअर या शब्दाचा शब्दशः अर्थ कारकीर्द असा होतो, परंतु या अर्थातून आपल्याला नेमके खरे काय ते, काहीच कळत नाही. त्यामुळेच माझ्या मते करिअर म्हणजेच कारकीर्द या शब्दाचे गरजेनुसार, परिस्थितीनुसार अथवा वयानुसार वेगवेगळे अर्थ होऊ शकतात आणि ते व्हायलाच हवे.

जर ० ते ५ वर्षापर्यंतच्या चिमुकल्यांबद्दल बोलायचे झाले तर, मोठेपणी त्यांचे करिअर तसेच व्यक्तिमत्व चांगले घडले पाहिजे यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करण्याचा हाच योग्य काळ असतो. बालपणी या लहानग्यांना आई-वडील, आजी-आजोबा अथवा पालक यांच्या मायेचा स्पर्श... मायेची ऊब सातत्याने मिळणे कधीही चांगले. कारण याच काळात या लहानग्यांच्या मेंदूची वाढ ही खूप जोमाने होत असते आणि या मायेच्या स्पर्शज्ञानातूनच त्यांच्या मेंदूची वाढ खूप चांगल्या प्रकारे होते. वयाच्या या सुरवातीच्या काळात मेंदूची जशी जडणघडण होते, त्यानुसारच मोठे झाल्यावर या लहानग्यांचे व्यक्तिमत्व तसेच स्वभाव ठरतो. म्हणूनच म्हणतो की, आपल्या लहानग्यांना चांगले करिअर द्यायची तुमची इच्छा असेल तर, या वयात त्यांना जास्तीत जास्त वेळ दिला पाहिजे. त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या पाहिजेत. त्यांना मांडीवर घेऊन थोपटायला पाहिजे. त्यांना दररोज प्रेमाने मिठी मारली पाहिजे. डोक्यावर हात फिरवून त्यांची विचारपूस केली पाहिजे. तसेच या लहानग्यांनी सतत प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांची एखाद्या गोष्टीबद्दलची जिज्ञासा वाढली पाहिजे अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. या स्पर्शज्ञानातून, स्पर्शाच्या संवेदनेतून अथवा संवादातूनच या लहानग्यांची चांगले विचार करण्याची क्षमता निर्माण होते, परिणामी मोठेपणी त्यांचे करिअर घडण्यासाठी मदत होते.

लहान बालगोपालांच्या म्हणजेच ५ ते १० वर्षांच्या मुलांबद्दल बोलायचे झाले तर, त्यांचे उज्वल भविष्य घडायला पाहिजे या हेतूने त्यांना पूरक असलेल्या विविध कृतीकौशल्यांचा विकास बरोबर होतो आहे किंवा नाही याची पडताळणी करणे (e.g. Fine Motor Skills, Gross Motor Skills, Brain Development, Critical Thinking, Co-ordination Creativity etc.) आणि त्यानुसार त्या चिमुकल्यांना सक्षम बनविणे, हा असाच करिअर या शब्दाचा अर्थ व्हायला हवा. हे करतांना पाल्यांच्या Intelligence Quotient (बुध्यांक) वाढविण्यासोबतच Emotional Quotient (भावनिकता) आणि Social Quotient (समाजशीलता) वाढवायची आहे, हे लक्षात असणं फार गरजेचं असतं. यामुळे पाल्य स्वतःच्या भावना व्यक्त करायला, त्या भावनांचे व्यवस्थापन करायला, त्या भावनांना नियंत्रण करायला तसेच दुसऱ्यांच्या भावनांची कदर करायला शिकतो, समाजामध्ये माणूस म्हणून वावरायला शिकतो. परंतु, आजच्या या धकाधकीच्या जीवनात आपल्या या बालगोपालांकडे अश्या पद्धतीने लक्ष द्यायला वेळ आहे का कुणाकडे? आजरोजी आपण एवढे स्वार्थी झालोय की, आपले स्वतःचे करिअर घडवण्याच्या वैयक्तिक स्वार्थापोटी आपल्याच लहान मुलांकडे दुर्लक्ष करून आपण त्यांचे करिअर धोक्यात आणतोय, हीच खरी शोकांतिका आहे.

त्यानंतर वळूयात ११ ते १७ या वयोगटातील मुलांकडे. खरं पाहिलं तर या वयोगटातील मुलांच्या प्रत्येक पालकाने त्यांच्या मुलांशी स्वतः त्यांचे भविष्य किंवा त्यांचे करिअर कसे असायला पाहिजे, याचे महत्व पटवून द्यायला पाहिजे. आता तुम्ही म्हणाल की, हे अजून काय भलतेच! कारण तुमच्यातील प्रत्येक व्यक्तीला असेच वाटते की, मी माझ्या मुलांकडे परिपूर्ण लक्ष देतो. परंतु हे खरे नाहीये. खरे बोलायचे झाले तर, या वयोगटातील मुलांना खरी गरज असते ती म्हणजे त्यांची रुची आणि क्षमता ओळखण्याची! परंतु

आपण खरंच देतो का या गोष्टीकडे वेळ? याउलट आपण काय करतो? तर सतत त्यांच्या अभ्यास करण्यावरच भर देतो. याचा अर्थ एकच होतो की, आपण त्यांना फक्त पुस्तकी किडे बनवतोय आणि त्यांना घडवायचे विसरतोय. माझे ऐकाल तर, या वयोगटातील मुलांशी प्रत्येक पालकाने हितगुज करायला पाहिजे...त्यांना कुठल्या क्षेत्रात स्वारस्य आहे हे जाणून घेतले पाहिजे. स्वतःच्या करिअरसंबंधी मुलांना त्यांची मते विचारायला पाहिजे. त्यानंतर त्यांची बौद्धिक आणि वैचारिक क्षमता ओळखून त्यांना त्यांचे आवडते क्षेत्र निवडण्यासाठी मदत करायला पाहिजे. किंबहुना या वयात पाल्याला ही जाणीव झालीच पाहिजे की, त्याने निवडलेले क्षेत्र कुठलेही असले तरी आपले आई-वडील आपले सल्लागार म्हणून आपल्या पाठीशी आहेत. कारण हीच जाणीव तुमच्या पाल्याला त्याने ठरवलेल्या मार्गावर चालण्यासाठी उत्साह आणि बळ देईल. हे जर शक्य झाले, तर नक्कीच त्यांचे उद्याचे भविष्य खूप उज्वल असेल...ते स्वावलंबी बनतील आणि ते उत्तम घडतील. माझ्या मते या वयोगटातील मुलांसाठी हाच खरा अर्थ आहे करिअरचा.

त्यानंतर १८ ते २३ या वयोगटातील मुलांना खरी आवश्यकता असते ती योग्य मार्गदर्शनाची, व्यक्तिमत्व विकासाची, योग्य व्यवस्थापनाची, संभाषण कौशल्याची, आत्मपरीक्षण करण्याची, समोरच्या व्यक्तीचा आदर करण्याची, छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधण्याची, चांगला श्रोता बनण्याची, योग्य लोकांशी ओळख वाढविण्याची, स्वतःला जाणून घेण्याची, परिस्थिती कशीही आली तरी ती योग्य प्रकारे हाताळण्याच्या कौशल्यवाढीची व सकारात्मकतेची. हेच खरे वय आहे की, ज्यामध्ये आत्ताच सांगितलेल्या गोष्टींमुळे तुमच्या पाल्याचे भविष्य सुखकर होते. योग्य मार्गदर्शनामुळे तुमचा पाल्य त्याच्या आयुष्याचे योग्य नियोजन करू शकतो. त्यामुळे प्रत्येक पालकाने, आई-वडिलांनी आपल्या पाल्याचे मार्गदर्शक व्हा असे मी म्हणेल, कारण तुमचा हा निर्णय तुमच्या पाल्याला आत्मविश्वास देईल. आता व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? या प्रश्नाकडे आपण वळूयात. आजच्या स्पर्धात्मक युगात व्यक्तिमत्व विकासाला खूप महत्व प्राप्त झाले आहे, कारण दैनंदिन व्यवहारात तुमच्या पाल्याला इतरांच्या तुलनेत सरस ठरवू शकतो तो फक्त व्यक्तिमत्व विकास. मी याआधीच तुम्हाला सांगितले की, जर तुमच्या पाल्याचे व्यक्तिमत्व उंचवायचे असेल, तर लहानपणी त्यांना तुमच्या प्रेमळ स्पर्शाची, तुमच्या सहवासाची, तुम्ही मिठीत घेऊन प्रेमाची ऊब देण्याची गरज आहे. जर या गोष्टी त्यांना मुबलक प्रमाणात मिळाल्या असतील, तर नक्कीच त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचा स्वभाव चांगला असेल. आता थोडे बोलूयात कुशल व्यवस्थानाबद्दल. आता कुशल व्यवस्थापन म्हणजे काय? हा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तर आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी वा कौशल्यांमध्ये आपल्या पाल्याला पारंगत करणे, म्हणजेच त्याला कुशल नेतृत्वाचे धडे देणे होय. त्यासाठी तुमच्या पाल्याला थोडे समाजात स्वच्छंदपणे वावरू द्या, स्वतःचे निर्णय घेऊ द्या, तो चुकला तर त्याला समजावून सांगा पण विनाकारण रागावू नका, कारण त्याला ठेच लागेल तेव्हाच त्याला चांगल्या वाईटाची प्रचिती येईल. याच गोष्टींमधून आलेल्या अनुभवांतूनच तुमच्या पाल्याला भरपूर शिकायला मिळेल आणि तो स्वावलंबी बनेल.

२४ वर्ष ते ३० वयोगटातील तरुण-तरुणींच्या मते करिअर म्हणजे फक्त नोकरी किंवा व्यवसाय. त्यामुळे या वयामध्ये त्यांना सांगायची काहीच गरज नसते, कारण ते स्वतःसाठी काय चांगले किंवा काय वाईट? हे पारखण्याइतपत नक्कीच विकसित झालेले असतात. या वयात ते स्वतःचे निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे ज्यांना नोकरी करायची आहे त्यांना नोकरी आणि ज्याला व्यवसाय करायचा आहे त्याला व्यवसायच करू दिला पाहिजे. परंतु त्यावेळी आपण पालक म्हणून काय करतो?...तर तुला काय कळते, मी तुझ्यापेक्षा जास्त उन्हाळे-पावसाळे बघितले आहेत, तू फक्त नोकरी कर, कारण व्यवसाय केला तर तुला लग्नासाठी कुणी मुलगी देणार नाही, व्यवसाय हा

आपल्यासाठी नसून तो फक्त सिंधी-मारवाड्यांसाठीच असतो, आपले नातेवाईक काय म्हणतील?, एवढा शिकलास आणि गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून व्यवसाय करतोस?, व्यवसाय नाही चालला तर पुढे काय?, व्यवसाय चालेलंच याची काय शाश्वती?, आपल्या समाजातील किती लोकांनी व्यवसाय केला, पण त्यांना नाही जमला, व्यवसाय जर का आपल्या लोकांना जमला असता, तर सगळ्यांनीच नसता का केला? इत्यादी नाना प्रकारे बोलून आपल्याच मुलांचा आत्मविश्वास उंचावण्यापेक्षा डळमळीत करतो आणि त्याला नोकरीच्या घाण्याला जुंपतो. त्यानंतर त्याच्याकडून अपेक्षा केल्या जातात त्या म्हणजे पगारवाढीच्या, प्रमोशनच्या. त्यानंतर आपण त्याला बोहल्यावर चढवतो आणि लग्न झाल्यानंतर त्याची सुरू होते ती तारेवरची कसरत. पण या दरम्यान कदाचित त्याचे खच्चीकरण होते. तो आपला आत्मविश्वास, आत्मसन्मान गमावून बसतो. आता मला सांगा, तुमच्या मुलांचे अश्या प्रकारे खच्चीकरण करून तुम्ही पालक म्हणून जिंकणार की हरणार? आणि त्यातल्या त्यात कुठल्या तरुणाने आपल्या पालकांचे न ऐकता एखादा व्यवसाय सुरू केलाच, तर बरेचसे पालक त्याला सतत विरोध करतात. त्याचा व्यवसायाचा मार्ग कसा चुकीचा आहे? याबद्दलच सतत चर्चा करतात, आजच्या काळात कुठल्याही व्यवसायाला आवश्यक असलेली संजीवनी बुटी म्हणजे भांडवल त्याला वेळेवर उपलब्ध करून देत नाहीत, त्याच्याशी धड बोलत नाहीत, त्याला कुठलेही मार्गदर्शन करीत नाहीत. आता सांगा या गोष्टी ज्या तरुणांच्या वाट्याला येतील, ते कसे काय यशस्वी उद्योजक होणार? त्यातून काही तरुण तावून-सुलाखून निघतात, तर काही तरुण या आयुष्याच्या बाबतीत नाउमेद होऊन, खचून निराशेच्या गर्तेत सापडतात आणि व्यसनाधीन होतात. कर्जबाजारी होतात किंवा आत्महत्या करतात. आता पालकांनो खरंच विचार करा, आपल्या पोटच्या मुलाला या वळणावर पोहोचविण्यासाठीच का तुम्ही एवढ्या खस्ता खाल्यात? त्यापेक्षा त्याच्या आवडीनुसार त्याला नोकरी अथवा व्यवसाय करू द्या, त्याला हवे ते क्षेत्र निवडू द्या. तो व्यवसाय करीत असेल, तर त्याच्या व्यवसाय वृद्धीसाठी कुठल्या संधी आहेत याबद्दल चर्चा करा. त्याचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने बहरण्यासाठी आवश्यक असलेली नीतिमूल्ये, कौशल्ये त्याने कशी आत्मसात करावी, याबद्दल त्याच्याशी सतत संभाषण करा. तुम्ही कुठलीही अपेक्षा न ठेवता त्याचे योग्य मार्गदर्शक बना, किंबहुना त्याचे सहकारी म्हणून त्याचा भक्कम आधार बना. बघा... असे जर खरंच शक्य झाले, तर तुमचा पाल्य त्याच्या आयुष्याकडे नेहमी सकारात्मकतेनेच बघेल आणि त्याच्यासारखा भाग्यशाली कुणीच नाही ही अनुभूती त्याला होईल. आता तुम्हीच ठरवा तुम्हाला तुमच्या पाल्याला या आयुष्याच्या सारिपाटावर कुठे घेऊन जायचे आहे ते? त्याला त्याच्या पद्धतीने करिअर घडवू देऊन स्वावलंबी बनवायचे आहे, की तुमच्या आज्ञेच्या अधीन राहून परावलंबी बनवायचे ते?

त्यामुळे मी तर म्हणेन की, तुमच्या मुलांचे करिअर घडवायचे असेल तर आई-वडील, आजी-आजोबा, पालक यांची मोलाची भूमिका पाल्यांसाठी प्रत्येक वयात फार महत्वाची असते. पालक म्हणून तुमची भक्कम साथ तुमच्या पाल्याला लाभली नाही, तर परिणामी तुमचा पाल्य ज्याप्रमाणे घडायला पाहिजे तसा घडणार नाही. म्हणूनच मी म्हणेन की, पालक म्हणून तुमच्या पाल्याची बलस्थानं नेमकी कुठली आहेत ते ओळखा, तुमच्या पाल्याची रुची ज्या क्षेत्रात आहे ते जाणून त्याला समर्थन द्या, तुमच्या पाल्याला त्याने निवडलेल्या मार्गावर चालण्यासाठी आत्मविश्वासरूपी बळ द्या, त्यांच्याशी नेहमी सु-संवाद साधा, तुमच्या पाल्याचे मार्गदर्शक बनून त्यांना योग्य रस्ता दाखवा, त्याचे मित्र बनून त्याच्या जीवनात येणाऱ्या काट्यांना दूर करा, त्याच्या आयुष्यात येणाऱ्या संकटांवर मात करून न खचता - न डगमगता सतत पुढे चालत राहण्यासाठी तुमची अनुभवरूपी शिदोरी त्याला द्या. आयुष्य हे एक पुस्तक आहे, त्यातील प्रत्येक पान म्हणजेच वेगवेगळे अनुभव आहेत. ते अनुभव तुमच्या पाल्यांना घेऊ द्या, कारण त्याच अनुभवातून त्यांना बरेचसे शिकायला मिळेल. खऱ्या अर्थाने हे असे झाले तर, तुमच्या पाल्यांचे

करिअर, व्यक्तिमत्व खुप चांगले असेल यांत तिळमात्र शंका नाहीये, पण सोबत त्यांच्या उज्वल भविष्याचे शिल्पकार पालक म्हणून तुम्ही स्वतःच बनाल आणि तुम्ही तुमच्या पाल्याला यशस्वी आणि समाधानी आयुष्य जगण्याचा अविस्मरणीय अनुभव देणार हे मात्र नक्की!

**– डॉ. वैभव फाटक,** निसर्गोपचार तज्ञ
counciling for health education
मोबा. ९७६९८३८८७३
mail : drphatakgmail.com


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

# गोखले ब्रदर्स

## सराफी दुकान

**शनिवार, दि. 4 पुष्य नक्षत्र**
**बुधवार, दि. 22 गुढी पाडवा**
**गुरुवार, दि. 30 गुरुपुष्यामृत**

आपलं दुकान
**महाद्वार रोडवर,**
**0231–2546585**


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**
**श्री. रोहित गवळी – 9657963475**

## सांगा पाहू उत्तरे

१. अति उच्च तापमानाला टिकून राहण्याच्या गुणधर्मामुळे विमानाचे जेट इंजिन बनवण्यासाठी ऱ्हेनिअम धातू वापरतात.
२. १९२५ साली महात्मा गांधींच्या कार्यात सहभागी होण्यासाठी आलेल्या ब्रिटिश महिलेचे नाव होते 'मेडेलीन स्लेड'. गांधीजींनी या मानस कन्येचे नामकरण 'मीरा बहन' असे केले.
३. दरवर्षी 'आंतरराष्ट्रीय जल दिन' २२ मार्च रोजी साजरा करतात.
४. दार्जिलिंगमध्ये सूप व नूडल्सपासून बनणाऱ्या आंबट, गोड व तिखट चव असलेल्या पदार्थास 'थुकपा' असे नाव आहे.
५. एलईडी यष्ट्यांची कल्पना क्रिकेट या खेळात सन २०१२ च्या 'बिग बॅश लीग' मधून आली.
६. 'पखाडो' ही पाककृती ओरिसात उन्हाळ्यात जास्त बनवली जाते.
७. जिराफ या प्राण्यावर लिहिलेले पहिले पुस्तक आहे 'द जिराफ'. ते १९७४ साली ॲनी इनिस डॅग या कॅनडाच्या संशोधिकेने लिहिले आहे.
८. 'आइसलँड' देशाला 'लँड ऑफ आइस अँड फायर' म्हटले जाते.
९. शल्यचिकित्सेचा जनक 'वैद्यकतज्ञ सुश्रुत' यांना मानले जाते.
१०. मज्जासंस्थेशी निगडित 'स्क्रॅपी' हा रोग शेळ्या–मेंढ्यांना होतो.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा. ९८१९७७०९७०

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

# लोणार सरोवराच्या बाजूचे विस्मयकारी रामाचे मंदिर

लोणार सरोवराच्या पाण्यापाशी जाताना उंचावरून एका पायवाटेने खाली उतरत यावं लागतं... हा रस्ता नागमोडी वळणाचा आणि जंगलातून जाणारा आहे. याच पायवाटेवर जरासं आडवाटेने बाजूला काही अंतर चालत गेलं की डाव्या बाजूला थोडंसं उंचावर हे एक अदभूत आणि खास वैशिष्ट्यपूर्ण असे श्रीरामाचे मंदिर आहे. मोडतोड आणि अत्यंत दुर्लक्षित झालेलं हे मंदिर अजूनही त्याच्या पुराणकालीन वैभवशाली श्रीमंतीची साक्ष देत उभे आहे.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदिरात फक्त श्रीरामाची मूर्ती आहे, सहसा श्रीराम यांची एकटी मूर्ती कधीही नसते. श्रीरामाच्या एका बाजूला बंधू लक्ष्मण आणि दुसऱ्या बाजूला पत्नी सीता उभे असतात. अजून खास म्हणजे श्रीराम यांची ही मूर्ती निशस्त्र अवस्थेत आहे आणि हेही वैशिष्ट्यपूर्ण आहे. श्रीरामाच्या हातात कायम धनुष्यबाण दाखवले जाते जे या मूर्तीत नाही.

यामागे एक खास कारण आहे. श्रीराम वनवासात असताना येथे या सरोवराच्या बाजूला वास्तव्यास असताना त्यांचे वडील दशरथ यांचे निधन झाले. श्रीरामांनी आपल्या वडिलांचा दशक्रियाविधी येथून वीस किमी अंतरावर असलेल्या पैनगंगा नदीच्या काठी मेहकर येथे केला. तेथेच श्री बालाजी यांची खास मूर्ती आहे.

श्रीराम यांना आपल्या वडिलांचे पिंडदान करायचे होते आणि ते वनवासात असल्याने त्यासाठी अट अशी होती की त्या विधीसाठी श्रीराम निशस्त्र असायला हवेत आणि त्यांच्याबरोबर कोणी स्वकीय असायला नको. हेच पिंडदान श्रीरामांनी या सरोवराच्या बाजूला केले आणि त्याच ठिकाणी सध्याचे हे निशस्त्र श्रीरामांचे मंदिर आहे.

या मंदिरात एक अचंबित करणारी गोष्ट अशी या ठिकाणी तुम्ही गाभाऱ्यात मूर्तीच्या समोर उभे राहून हात जोडून नमस्कार करायला उभे राहिलात की तुम्हाला श्रीरामांच्या मूर्तीच्या एका बाजुला लक्ष्मण आणि दुसऱ्या बाजूला सीता मातेचे दर्शन होते. हे खूपच आश्चर्यकारक आहे. त्यामागे एक खास कारण आहे. या मंदिरात सभामंडपात दगडी सुबक नक्षीकाम केलेले बारा खांब आहेत, जे एका विशिष्ट रचनेत मंदिरात बसवले गेले आहेत. चार मोठे खांब सभामंडपात मध्यभागी आणि चार छोटे खांब उजव्या बाजूला आणि चार डाव्या बाजूला. हे खांब अशा रितीने बसवले गेले आहेत की ज्यावेळी आपण मूर्ती समोर हात जोडून उभे असतो त्यावेळी प्रकाशाची किरणे विशिष्ट कोनातून परावर्तित होऊन आपली स्वतःची सावली श्रीरामाच्या मूर्तीच्या बाजूला अशा प्रकारे पडते की आपल्याला त्या मूर्तीच्या एका बाजूला सीतामाता आणि दुसऱ्या बाजूला लक्ष्मण उभे आहेत हा भास निर्माण होतो. मी हे प्रत्यक्ष बघितल्यावर अंगावर रोमांच उभे राहिले. जरा विचार करा त्यावेळी आजच्या सारखे कॅलक्युलेटर , संगणक, दुर्बीण, होकायंत्र अशी कोणतीही अद्ययावत साधन सामुग्री उपलब्ध नसताना हे त्यांनी कसे निर्माण केले असेल? अहो, एक दोन सेंटीमीटर जरी खांबांची लांबी, रुंदी, ठेवण बदलली तरी ही विस्मयकारी गोष्ट साकारणे केवळ अशक्य आहे. यावरून त्याकाळी विज्ञान किती प्रचंड ताकदीचे होते याची प्रचिती येते...

एवढंच नाही तर या मूर्तीच्या समोर उभे राहून तुम्ही आपले दोन्ही हात डोक्यावर सरळ उभे नेऊन डावीकडे उजवीकडे बाय बाय केल्यासारखे हलवले तर श्रीरामांच्या मस्तकाच्या वर मागच्या भिंतीवर या आपल्या हातांच्या सात सात सावल्या पंखा घालत असल्यासारख्या हलताना दिसतात. हे दोन्ही प्रकार मी स्वतः प्रत्यक्ष अनुभवल्यावर माझ्या अंगावर अक्षरशः काटा उभा राहिला ! अजूनही हे खास वैशिष्ट्य या मंदिरात आढळले...

# श्रीमती रोहिणी कानिटकर यांना सन्मानपत्र प्रदान






महाराणी शांतादेवी गायकवाड गृहशास्त्र शिक्षण संस्थेचे 'गागी देसाई टोपीवाले विद्याभवन' च्या माजी शिक्षिका श्रीमती रोहिणी दत्तात्रय कानिटकर यांना नुकतेच विद्यालयातर्फे त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या गौरवार्थ त्यांचा सत्कार करून त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

त्या सन्मानपत्रात शाळेने हे मानपत्र म्हणजे आमच्या भावनांचं केवळ एक छोटसं प्रतिक आहे असे म्हटले असून त्यांच्या पुढील कार्यास मन:पूर्वक शुभेच्छा दिलेल्या आहेत.

श्रीमती रोहिणी कानिटकर कोल्हापूर चित्पावन संघाचे माजी कार्यवाह कै. दत्तात्रय कानिटकर यांच्या पत्नी असून परशुराम पतसंस्थेच्या विद्यमान संचालक आहेत. संघाच्या सर्वच समारंभात त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो.

नवस्नेह परिवाराकडून श्रीमती कानिटकर यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा !

**– नंदकुमार मराठे**
अध्यक्ष,
कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

यावरून जरा विचार करा की आपले पूर्वज किती विद्वान आणि प्रचंड कलात्मक होते. त्याकाळची पाषाण शिल्पकला किती अफाट होती. आपण कल्पनाही करू शकत नाही इतकं हे भव्यदिव्य आहे, पण काळाच्या ओघात अक्षरशः नेस्तनाबूत होत आहे...

अरे हो, अजून एक खास बाब अशी या मंदिरात होकायंत्र काम करत नाही. तिथे मंदिरात विश्रांतीसाठी खाली जमिनीवर बसलो असताना होकायंत्र काढून वेगवेगळ्या दगडावर ठेऊन पाहिलं तर त्या होकायंत्राची सुई दक्षिण उत्तर दाखवत नाही. वेगवेगळ्या दगडावर होकायंत्र ठेवलं की ती सुई भरकटत जाते पण स्थिर दक्षिण उत्तर होत नाही. आहे की नाही गमतीशीर?... अर्थात यामागे शास्त्रीय कारण आहे...

या मंदिराची सध्याची अवस्था पाहून मन विषण्ण झालं... इतकं मोठं वैभव आपल्याकडे आहे याचा खरोखरच अभिमान वाटतो...

**– कुलकर्ण्यांचा 'रामभक्त' प्रशांत**

# झपुर्झा – पु.ना.गाडगीळ आणि सन्सचा एक नवीन उपक्रम




तुम्ही पुण्यात याल तेव्हा आवर्जून भेट द्यावी असे हे ठिकाण आहे. गाडगीळ सराफांनी व्यवसाय करता करता खडकवासला धरणाच्या मागील बाजूच्या अतिशय निसर्गरम्य परिसरात कष्टपूर्वक, चोखंदळपणे आणि मुक्त हस्ते खर्च करून, रसिकता जोपासत हे कलात्मक म्युझियम साकारले आहे. या निसर्गसमृद्ध परिसरात सर्वसामान्य जनतेसाठी वस्तू संग्रहालय रूपाने उपलब्ध करून दिलेल्या या कलादालनाचे प्रवेश मूल्य जरी रु. १००/- प्रत्येकी घेण्यात येत असले तरी सर्व संग्रहालय पाहून झाल्यावर ते अति नामामत्र असल्याचे आपणाला जाणवते. आपण आता कधी पुण्याला याल तेव्हा जरूर या कलादालनाला भेट देऊन आनंद घ्या ! मात्र दालन सोमवारी बंद असते हे विसरू नका !

**झपूर्झा !**

- जीवनामध्ये कला आणि संस्कृतीला अनन्यसाधारण महत्व आहे. कला जीवनाला समृद्ध बनवते आणि आपल्या देशाला तर कलेचा खूप मोठा आणि वैभवशाली वारसा लाभला आहे.
- आपल्या सर्वांनाच आणि विशेषत: पुढच्या पिढीला हा वारसा बघायला मिळावा, आपल्या संस्कृतीची व कलांची ओळख व्हावी आणि त्यांची आवड निर्माण व्हावी हा झपूर्झा चा मुख्य उद्देश आहे.
- इथे भारतातील प्रसिद्ध कलाकारांची चित्रे (राजा रवि वर्मा, रविंद्रनाथ टागोर इ.) आणि शिल्पकृती पाहायला मिळतील. येथे आपल्या वस्त्रांच्या परंपरेचे (प्रामुख्याने पैठणी) प्रदर्शन आहे. तसेच सोन्या-चांदीचे दागिने, जुन्या वस्तू, विविध प्रकारचे दिवे अशा अनेक जुन्या-नवीन वस्तू आपल्याला इथे पहायला मिळतील.
- याशिवाय झपूर्झामध्ये विविध विषयांवरच्या कार्यशाळा, परिसंवाद तसेच चित्रपट, नाट्य, संगीत इ. चे विविध कार्यक्रमही नियमित स्वरूपात होतात.
- सात एकर जागेवर वसलेले झपूर्झा हे महाराष्ट्रातील कला व संस्कृतीसाठी असलेले एकमेव व्यासपीठ आहे. झपूर्झा हे सर्वांसाठी आहे. आपल्याला आग्रहाचे निमंत्रण!

**झपूर्झा मध्ये आहेत –**

- १० कला दालने : ह्यात वेगवेगळ्या विषयांवरची प्रदर्शने आहेत. जी नेहमी बदलत राहतील. त्यामुळे दरवेळी आपल्याला येथे काहीतरी नवीन बघायला मिळेल.
- २०० लोकांसाठी सुसज्ज प्रेक्षागृह : येथे नाट्य, नृत्य, संगीत इ. चे कार्यक्रम असतील.
- अँफी थिएटर : ६०० प्रेक्षकांसाठीचे हे खुले (ओपन एअर) थिएटर आहे. इथेही सर्व प्रकारचे कार्यक्रम असतील.
- उपहार गृह (कॅफे) : अस्सल मराठी तसेच इतरही खाद्य-पेय, संपूर्ण भोजन यासाठी खास व्यवस्था.
- कार्यशाळा : विविध कला, हस्तकला उदा. टेराकोटा, पॉटरी, चित्रकला, नृत्य इ. च्या कार्यशाळांसाठी वेगवेगळ्या जागा.

**झपूर्झा आहे –** पुण्याच्या अगदी जवळ खडकवासला धरणाच्या काठी, निसर्गरम्य परिसरात.

**पत्ता :** 'झपुर्झा', सर्वे क्र. ६५, कुडजे गाव, पिकॉक बे च्या थोडे पुढे, खडकवासला, पुणे ४११ ०२३ महाराष्ट्र.

फोन : ७०२८०६७८००, वेबसाईट : www.zapurza.org

**वेळ :** मंगळवार ते शुक्रवार सकाळी ११ ते सायं. ६

शनिवार-रविवार सकाळी ११ ते सायं. ७

सोमवार सुट्टी

- शाळा/कॉलेज/ऑफिस ट्रिप्ससाठी जरूर संपर्क करा.
- गाईडेड टूर्स उपलब्ध आहेत.
- कार्यक्रमांविषयी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच फोनवर सुद्धा आपल्याला माहिती मिळू शकते.

**– अविनाश जोग, कोल्हापूर**

मोबा. ९४२०३५४६११

# कोल्हापूर चित्पावन संघ आणि
# We For Ours युवा मंच आयोजित पन्हाळा सहल






किल्ले पन्हाळगड : ऐतिहासिक स्थळ दर्शन अभ्यास मोहीम शनिवार दि : ११ फेब्रुवारी २०२३ रोजी अतिशय नेटक्या पद्धतीने पार पडली. यामध्ये संघातील १२ युवक युवतींचा सहभाग होता.

सह्याद्रीच्या डोंगररांगेतील घाटमाथ्यावर असणाऱ्या गडांपैकी कोल्हापूर भागातील पन्हाळगड हा महत्त्वाचा किल्ला आहे. सन १६६०मध्ये पन्हाळगडाला सिद्दी जोहारने वेढा दिला, तेव्हा छत्रपती शिवाजीराजे यांनी मोठ्या शिताफिने स्वत:ची सुटका करून विशाळगडकडे रवाना झाले या महत्वाच्या घटनांचा पन्हाळा साक्षीदार आहे. नैसर्गिक जलस्रोत आणि भौगोलिक रचनेमुळे अनेक राजवटींच्या काळात राजकीयदृष्ट्या महत्वाचे केंद्र होते. ऐतिहासिक स्थळ दर्शन मोहीमेतून करवीर राज्य संस्थापनेच्या काळात मराठ्यांची काही काळ राजधानी असणारा हा किल्ला आणि तत्कालीन राजकीय स्थिती यांचा ऐतिहासिकदृष्ट्या आढावा आणि किल्लयावरील महत्वाच्या वास्तू, इमारती, समाधी, मंदिर, दरवाजे, बुरुज आणि तलाव-विहिरी यांची माहिती स्थळ दर्शन मोहीमेतून कोल्हापूर येथील युवा इतिहास अभ्यासक आणि संशोधक श्री. मानसिंग चव्हाण यांच्याकडून जाणून घेण्यात आली. इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आणि त्यावरील वास्तूंचे महत्व व इतिहास समजुन घेण्यासाठी या मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते.

या मोहिमेत केदार जोशी, अमित आपटे,सौ. वेदा आपटे,महेश आपटे,सौ.मृणालिनी आपटे, अमेय फाटक, अनंत फाटक, अमेय नातू,अमूल्य नातू,सौरभ पाटणकर, अनिरुद्ध खाडिलकर, अमेय गोखले आणि मानसिंग चव्हाण या सर्वांचा समावेश होता.

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - मार्च २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चैताली AB +ve | देशस्थ | १५/११/९३ ५.७ | गार्ग्य, वृश्चिक ज्येष्ठा, प्रथम आद्य, राक्षस | M.Tech. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १४ लाख | मेघ:श्याम नरहर जोशी अंबेगाव, कात्रज, पुणे. ९९६०४९५३५१ |
| २. | चिन्मयी O +ve | देशस्थ | १३/१२/९४ ५.३ | काश्यप, मेष, अश्विनी, तिसरे, आद्य, देव | C.A. | सारस्वत बँक कोल्हापूर | वा.प्रा. ६.४८ लाख | दिनेश कुलकर्णी राजारामपुरी, कोल्हापूर. ९४२३८५९९४३ |
| ३. | स्नेहांकिता --- | देशस्थ | १३/०१/९५ ५.२ | शांडिल्य, वृषभ रोहिणी, दुसरे, मनुष्य, अंत्य | B.Com. CS | खाजगी नोकरी | मा.प्रा. --- | गुंडोपंत अनंत कुलकर्णी खंडोबा तालीम मंडळ, कोल्हापूर. ९८८१३७८८१५ |
| ४. | डॉ.वैजयंती B +ve | देशस्थ | १८/४/९५ ५.२ | गार्ग्य, वृश्चिक ज्येष्ठा, चतुर्थ आद्य, राक्षस | BAMS Doctor | माधवबाग कोल्हापूर येथे | वा.प्रा. २ लाख | विवेक वामन बागेवाडी कोल्हापूर. ९८२२६९०८३५ |
| ५. | प्रियांका A +ve | कोकणस्थ | ०१/०२/९६ ५.४ | भारद्वाज, मिथून, आर्द्रा, द्वितीय, आद्य, मनुष्य | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १३ लाख | बाळकृष्ण विष्णू रानडे कागल, कोल्हापूर ९९६०४५७४०९ |
| ६. | मेघा B +ve | देशस्थ | १२/०३/९६ ५.३ | काश्यप, वृश्चिक, ज्येष्ठा, ४ थे राक्षस | B.E. C.Dac Course | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५.२५ लाख | संजीव जोशी जुना वाशी नाका, कोल्हापूर ९४०५०४०५२३ |
| ७. | दिव्या AB +ve | देशस्थ | २६/०६/९७ ५.३ | जामदग्नी, कुंभ पूर्वाभाद्रपदा, २रे आद्य, मनुष्य | B.E. | --- | मा.प्रा. --- | दत्तात्रय कुलकर्णी बेडकीहाळ, जि. बेळगांव ९७४३७५२३०५ |
| ८. | मनिषा A +ve | देशस्थ | १८/०८/९७ ५.८ | भारद्वाज, मकर धनिष्ठा, पहिले मध्य, राक्षस | B.Com. MBA | कोल्हापूर येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. १ लाख | अविनाश प्र. पाटील ताराबाई रोड, कोल्हापूर ९४२३३९०२५० |
| ९. | श्रावणी --- | कोकणस्थ | ०७/०५/९८ ५.२ | कौशिक, कन्या उत्तरा, चौथे आद्य, मनुष्य | B.Sc. LLB | प्रॅक्टिस | मा.प्रा. २.५० लाख | श्रीपादश्री खरे तासगांव, जि. सांगली. ९८२२५४०२१४ |
| १०. | कौमुदी O +ve | कोकणस्थ | १०/०९/९८ ४.११ | गार्ग्य, मेष, भरणी, प्रथम, मध्य, मनुष्य | B.Com. Tally | --- | मा.प्रा. --- | चैतन्य शंकर गाडगीळ मु.पो.मेढा, ता.जावळी, जि. कोल्हापूर ९८९००१६४४४ |

**प्रियांका प्रभाकर कुलकर्णी** (O +ve)
**जन्मतारीख :** २१/१२/१९९६ **उंची :** ५.६
**शिक्षण :** B.E. (Computer Science & Engg)
**नोकरी :** Gallagher Services Kolhapur as a Sr. Process Executive **वा.प्रा. :** ---
**पत्ता : श्री. प्रभाकर अरविंद कुलकर्णी**
साईनाथ पार्क, पाचगांव रोड, कोल्हापूर 416 012
मोबा. 9881072158, 9921484197

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | मेष | कृतिका | प्रथम | अंत्य | राक्षस |

**ऋतुजा प्रसाद देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी)**
**जन्मतारीख :** ९/६/१९९८ **उंची :** ५.१ (O +ve)
**शिक्षण :** B.B.A., M.B.A. (HR, Finance)
**नोकरी :** HR Manager TRN Pharmaceutical
**अपेक्षा :** अनुरुप, समंजस, सुशिक्षित, निर्व्यसनी, वेल सेटल
**पत्ता : श्री. प्रसाद देशपांडे**
मु.पो. इंगळी, ता. हातकणंगले,
मोबा. 9359610271

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| विष्णुवर्धन | वृश्चिक | अनुराधा | तिसरे | मध्य | देवगण |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - मार्च २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गिरीष O +ve | देशस्थ | २१/१२/८४ ५.७ | भारद्वाज, वृश्चिक अनुराधा, चौथे मध्य, देवगण | B.Com. | SBI Life Insurance (परमनंट) | वा.प्रा. ८.४० लाख | दशरथराव कुलकर्णी मुडशिंगी, उचगाव, कोल्हापूर ९८९०९४२०६१ |
| २. | परशुराम O +ve | देशस्थ | २१/०५/८५ ५.९ | हरित, वृषभ मृग, पहिले मध्य, देवगण | MCA | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | प्रदिप महादेव कुलकणी सर्किट हाऊससमोर,कोल्हापूर ९७६६९४९६९३ |
| ३. | महेश O +ve | कऱ्हाडे | ३०/०१/८६ ५.३ | कौशिक, कन्या हस्त, प्रथम आद्य, देव | B.E. | डेव्ह.ऑफि LIC मध्ये | मा.प्रा. ८०,०००/- | महेश कुमार सरवटे मु.आसुर्ले, पो.पोर्ले, ता.पन्हाळा.९१५८२६२७२७ |
| ४. | हर्षल A +ve | देशस्थ | १२/११/८७ ५.७ | वसिष्ठ, कर्क, पुष्य, दुसरे मध्य, देवगण | B.Com. | खाजगी नोकरी | वा.प्रा. ३ लाख | उदय मधुसूदन कुलकर्णी मगदूम लॉन, कोल्हापूर ९६३७६१२४९६ |
| ५. | निलेश A +ve | कोकणस्थ | १७/०९/८८ ५.२.५ | वसिष्ठ, वृश्चिक अनुराधा, तिसरे मध्य, देवगण | D. Pharm | मेडीकल स्टोअर | वा.प्रा. ७ लाख | चंद्रकांत मोडक मोती चौक जवळ, सातारा ९६५७१७५१६८ |
| ६. | सौरभ --- | देशस्थ | १५/०६/८९ ६.० | भारद्वाज, तूळ स्वाती, पहिले अंत्य, देव | Auto-mobile Diploma | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ८ ते ९लाख | स्नेहा संजय परांडेकर राजरामपुरी, कोल्हापूर ९७६३०५५७७१ |
| ७. | प्रसाद B +ve | कोकणस्थ | २४/०८/९० ५.४ | काश्यप, कन्या चित्रा, पहिले मध्य, राक्षस | B.E. | मुंबई येथे नोकरी | मा.प्रा. ५८,०००/- | अविनाश गोखले अंधेरी पूर्व, मुंबई ९४२३९९२९१८ |
| ८. | प्रसाद O + ve | देशस्थ | ०४/०७/९१ ५.८ | भारद्वाज, मीन उ.भाद्र.,प्रथम मध्य, मनुष्य | M.E. | मौरीटेक कं. कोल्हापूर | वा.प्रा. १२.५ लाख | शशिकांत कुलकर्णी गणेश कॉलनी, कळंबा रोड, कोल्हापूर. ७४९९५४५०५३ |
| ९. | सुशांत O +ve | देशस्थ | ०४/११/९२ ५.४ | वसिष्ठ, धनु मूळ, तिसरे, आद्य, राक्षस | B.Com. CMA Appear | फायनान्स कंपनीमध्ये | मा.प्रा. १.८० लाख | सुशांत जयंत गुळवणी आय.टी.सी.कॉलनी,कोल्हापूर ७३८५५८२४१४ |
| १०. | अनंत O +ve | सारस्वत | १७/०६/९३ ५.७ | काश्यप, वृषभ कृतिका, अंत्य, राक्षस | Hotel Manag. V.R.Dip. | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ३ लाख | धनंजय शिरोडकर बाबा जरगनगर, कोल्हापूर ९४२०१३५७४१ |

**वैभव चंद्रकांत मोडक (कोकणस्थ)** (A +ve)

**जन्मतारीख :** २०/१०/१९९२ **उंची :** ५.८

**शिक्षण :** MBA, B.E. (Mechanic)

**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा. :** ३,५०,०००/-

**पत्ता : श्री. चंद्रकांत विश्वनाथ मोडक**

न्यू पॅलेस रोड, महावीर कॉलेज जवळ, कोल्हापूर.

मोबा. 7387277698, 9422046230

**अपेक्षा :** पदवीधर, मनमिळावू, नोकरी असावी

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| वसिष्ठ | कर्क | आश्लेषा | दुसरे | अंत्य | राक्षस |

**नरेंद्र विनायक फाटक** (B +ve)

**जन्मतारीख :** १९/०७/१९९४ **उंची :** ५.८

**शिक्षण :** M.Pharm

**नोकरी :** नोकरी **मा.प्रा. :** ४०,०००/-

**पत्ता : श्री. विनायक प्रभाकर फाटक**

विष्णुमंदिरसमोर, ब्राह्मणपुरी,मु.पो.कुरुंदवाड, ता. शिरोळ,

जि. कोल्हापूर. मोबा. ७७४३८३९१५९, ९८८१०७२३७५

**अपेक्षा :** बी. फार्म, कोणतीही शाखा चालेल.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कौशिक | वृश्चिक | अनुराधा | दुसरे | आद्य | राक्षस |

# आपल्या ‘नवस्नेह’ च्या वाटचालीविषयी...

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र ‘नवस्नेह’ आता घरोघरी पोहोचले आहे.

सन १९८८ पासून ‘साप्ताहिक प्राजक्त’ च्या माध्यमातून नियमितपणे चित्पावन कुटुंबियांशी संपर्क साधण्यासाठी सुरू झालेला आमचा हा संपर्क प्रवास पुढे ‘स्नेहदर्शन’ पासून आत्ताच्या शासकीय नोंदणीकृत ‘कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र - मासिक नवस्नेह’ पर्यंत गेली सुमारे ३२ वर्षे सातत्याने सुरूच आहे.

या प्रदीर्घ कालखंडात प्रारंभी श्री. दीपक भागवत सर आणि प्रा. जोशी सर यांनी या अंकाची धुरा समर्थपणे वाहिली आणि मासिक नावारूपाला आणले. कालानुरूप मासिकाचा आकार, रंग, रूप, त्यातील साहित्य यामध्ये बदल होत गेले. गेली ७ वर्षे सध्याच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले नवस्नेहचे संपादन सांभाळत असून त्यांच्या कल्पनेनुसार अंकाचे स्वरूप अधिकाधिक वाचनीय आणि अभिरुचिपूर्ण होत आहे.

संघाचे कार्यवाह आणि नवस्नेहचे संवर्धक कै. द. गो. कानिटकर यांनी यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अंकाचे स्वरूप नित्यनवीन, आकर्षक व्हावे, वाचकप्रिय, दर्जेदार मजकूर नियमितपणे देता यावा यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. दिल्ली दरबारी जाऊन त्यांनी नवस्नेहला शासनमान्यताही मिळविली. महाराष्ट्रभर आणि शेजारील राज्यातही चित्पावन कुटुंबियात ‘नवस्नेह’ वाचला जावा आणि वाचक, वर्गणीदार प्रतिसादावर त्याचे प्रकाशन निरंतर सुरू राहावे यासाठी कानिटकरांनी अखेरपर्यंत प्रयत्न केले.

आज सभासद यादीनुसार नवस्नेहच्या १६०० प्रती दरमहा पोस्टाने पाठविल्या जातात. मात्र दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यातील सुमारे २५० अंक दरमहा परतही येतात. आपल्या अनेक सभासदांनी त्यांचे बदललेले पत्ते वारंवार आवाहन करूनही (दरमहाच्या अंकातही ते आवाहन असतेच) कार्यालयात कळवलेले नाहीत. काही दिवंगत सभासदांच्या वारसांनी संघाच्या कार्यालयाशी संपर्क साधून नावातील बदल करून घेणे आवश्यक आहे. तसे बदल झालेले दिसत नाहीत. अंक सभासदांना न पोहोचण्यात अशा अनेक अडचणी दिसून आल्या असून अशा सर्व बाबींची खातरजमा करून सभासद यादी अद्ययावत करण्याचे काम आम्ही सुरू केले आहे.

कृपया नवस्नेहच्या सर्व सभासदांनी आपले कायमस्वरूपी अद्ययावत पत्ते आणि फोन/मोबाईल क्रमांक संघाच्या कार्यालयात लवकरात लवकर कळवून सहकार्य करावे, ही नम्र विनंती. तसेच पत्त्यांची खातरजमा करण्याच्या या काळात कदाचित काही वाचकांना त्यांचे अंक न मिळाल्यास त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा, त्यांना अंक कार्यालयातून मिळू शकेल. कळावे.

आपला,

नंदकुमार मराठे (अध्यक्ष)

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO

TÜV CERT
DIN EN ISO 9001:2000
CERTIFICATE: 01 100 028964

C-DOT

R. D. S. O.




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.